महाराष्ट्रातील गुन्हेगारीविरूद्ध लढा देणारे एकमेव मराठी वृत्तपत्र...

# महाराष्ट्र क्राईम टाइम्स

MCT वार्ता DIGITAL

प्रकाशन : मुंबईसह एकाच वेळी प्रसारीत ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, पुणे, सातारा, कोल्हापूर, जालना, नाशिक

मूल्य २/- रुपये

Maharashtracrimetimes.com | MHCrimeTimes | MAHCrimeTimes | 9803386748 | maharashtracrimetimes@gmail.com

• संपादक : राकेश शंकर गोरे • वर्ष : १६ अंक : ४३ पृष्ठ : ८ मुंबई, मंगळवार २० जानेवारी २०२६ ते सोमवार २६ जानेवारी २०२६ • POSTAL REG.NO. MCN/157/2026-2028 • PRGI. REG. NO. MAHMAR/2010/33301

## संक्षिप्त

### एमआयएमचा मोठा निर्णय! १२ जिल्ह्यांत जिल्हा परिषद निवडणूक लढवणार



▮ **मुंबई :** महानगरपालिका निवडणुकांमधील इत्तेहादुल मुस्लिमीन (एमआयएम) पक्षाने यशानंतर ऑल इंडिया मजलिस-ए-आता जिल्हा परिषद निवडणुकांमध्ये उतरण्याचा निर्णय घेतला आहे. राज्यातील एकूण १२ जिल्हा परिषदांमध्ये एमआयएमकडून उमेदवार दिले जाणार असून, यासाठी इच्छुक उमेदवारांकडून अर्ज स्वीकारले जाणार आहेत, राज्यातील नगरपालिका निवडणुकांमध्ये एमआयएमचे ८३ नगरसेवक निवडून आले आहेत. त्यानंतर विविध महानगरपालिकांमध्ये १२५ नगरसेवक विजयी झाले. या निकालांच्या तुलनेत राष्ट्रवादी काँग्रेस, मनसे यांच्यासह इतर पक्षांपेक्षा एमआयएमला अधिक यश मिळाले आहे. या पार्श्वभूमीवर फेब्रुवारी महिन्यात जाहीर होणाऱ्या जिल्हा परिषद निवडणुकांसाठी उमेदवार देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्याची प्रक्रिया सुरू झाल्याचेही ते म्हणाले. ग्रामपंचायत निवडणुकांमध्ये पॅनलद्वारे उमेदवार उभे करण्यात आले असून अनेक ठिकाणी यश मिळाले आहे. त्यामुळे जिल्हा परिषदेतही चांगले यश मिळेल, असा विश्वास शेख अहमद यांनी व्यक्त केला. छत्रपती संभाजीनगर, जालना, सोलापूर, सांगली, रत्नागिरी, धाराशिव यासह एकूण १२ जिल्ह्यांमध्ये उमेदवार निवडणूक रिंगणात उत्तरवण्याचा पक्षाचा प्रयत्न असल्याची माहिती शारेख नक्षबंदी यांनी दिली.

### अखेर पश्चिम रेल्वेचा कांदिवली–बोरिवली सहावा ट्रॅक सुरू!

▮ **मुंबई :** पश्चिम रेल्वेवरील कांदिवली ते बोरिवली दरम्यान उभारण्यात आलेल्या सहाव्या रेल्वे मार्गाचे काम पूर्ण झाले असून १९ जानेवारीपासून या मार्गावर नियमित वाहतूक सुरू करण्यात आली आहे. पश्चिम रेल्वेची सहावी मार्गिका मुंबईच्या उपनगरीय रेल्वे जाळयात एक महत्वाचा टप्पा मानली जात आहे. नव्या मार्गामुळे कांदिवली–बोरिवली या अत्यंत वर्दळीच्या पट्ट्यात रेल्वे वाहतुकीची क्षमता वाढणार आहे. लांब पल्ल्याच्या आणि एक्सप्रेस गाड्यांना स्वतंत्र मार्ग मिळाल्याने उपनगरिय लोकलवरील दबाव कमी होणार असून, लोकल सेवा अधिक वेळेवर चालण्यास मदत होणार आहे. रेल्वे प्रशासनाने या मार्गावर आवश्यक तांत्रिक चाचण्या आणि सुरक्षिततेची प्रक्रिया पूर्ण केली असून मंजुरीनंतरच प्रवासी वाहतूक सुरू करण्यात आली आहे. मुंबई सेंट्रल ते बोरिवली विस्तार योजनेतील हा महत्त्वाचा टप्पा मानला जात असून, याचा फायदा पश्चिम रेल्वेने प्रवास करणाऱ्या लाखो मुंबईकरांना होणार आहे.

# मुंबई महानगरपालिकेत महायुतीचाच महापौर !

## जिथे युतीमध्ये लढलो तिथे महायुतीचा महापौर होणार - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले स्पष्ट



▮ **मुंबई (गणेश बागडे) :** शिवसेना आणि भाजप हे मुंबई महानगरपालिकेत महायुती एकत्र निवडणूक लढले असून मुंबईत महायुतीचा महापौर होईल असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केले आहे. ठाणे, कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर यासह महायुती म्हणून जिथे जिथे एकत्र निवडणूक लढलो त्याठिकाणी महायुतीचाच महापौर बनवण्यात येईल असेही त्यांनी सांगितले. मुंबईमध्ये महानगर निवडणूकध्ये कोणत्याही एका पक्षाला स्पष्ट बहुमत मिळाले नसल्याने, आणि शिवसेनेने आपले नगरसेवक पंचतारांकित हॉटेलमध्ये ठेवल्याने याबाबत अनेक तर्क वितर्क लावण्यात येत होते. मात्र या सर्व शंकाकुशंकांना पूर्णविराम देत मुंबित महायुतीचाच महापौर होईल असे शिंदे यांनी स्पष्ट केले आहे. मुंबईकर नागरिकांनी मोठ्या विश्वासाने महायुती म्हणून सेना - भाजपला मतदान केले असून त्यांच्या मतांशी प्रतारणा करून कोणताही वेगळा निर्णय शिवसेना घेणार नाही. नागरिकांनी याबाबत कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये असेही ते म्हणाले. यासोबतच ज्या ज्या मनपामध्ये शिवसेना भाजप हे महायुती म्हणून एकत्र निवडणूक लढले आहेत तिथेही महायुतीचाच महापौर बसविण्यात येईल असेही त्यांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळे मुंबईसह महाराष्ट्रात अन्य काही राजकीय समीकरणे तयार होत असल्याबद्दल सुरू असलेल्या चर्चांमध्ये अजिबात तथ्य नसून मुंबईत शिवसेना भाजप रिपाइं महायुतीचा महापौर होईल असे त्यांनी सांगितले.

## आता ९ रुपयांत मेट्रो स्टेशनपासून घरापर्यंत वातानुकूलित प्रवास!

### मेट्रो लाईन-३ ची Cityflo सोबत भागीदारी

▮ **मुंबई (सम्यक कासारे) :** मुंबई मेट्रोने प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी आता स्टेशनबाहेर पडताच सुरू होणारा ऑटो, टॅक्सी मिळवण्यासाठी होणारा संघर्ष बसची गर्दी आता इतिहासजमा होणार आहे. रिक्षा, कॅबच्या भाड्याचा ताण आणि बससाठीची गर्दी टाळत आता अवघ्या ९ रुपयांत वातानुकूलित बसमधून घर किंवा कार्यालयापर्यंत पोहोचता येणार आहे. मेट्रो लाईन-३ वर प्रवास करणाऱ्यांसाठी ही मोठी दिलासादायक व्यवस्था ठरणार आहे. कुलाबा–वांद्रे–सीप्झ या भुयारी मेट्रो मार्गावर प्रवाशांचा ओघ झपाट्याने वाढत आहे. मेट्रोला मिळणारा हा वाढता प्रतिसाद पाहता, प्रवाशांचा शेवटचा टप्पा अधिक सोपा करण्यासाठी मेट्रो प्रशासनाने सिटीफ्लोच्या सहकार्याने थेट बससेवेचा निर्णय घेतला आहे. मेट्रो स्थानकांपासून जवळच्या निवासी आणि व्यावसायिक भागांपर्यंत ही सेवा थेट कनेक्टिव्हिटी देणार आहे. अंतिम टप्पा सुरू झाल्यानंतर केवळ काही महिन्यांतच मेट्रो-३ वरील प्रवासीसंख्या दुपटीने वाढली आहे. पान २ वर




## महापौर निवडीचा मार्ग मोकळा!

### २२ जानेवारीला आरक्षण सोडत, तर २८ जानेवारीला मुंबई महापौरपदासाठी मतदान



▮ **मुंबई (नितीन देवळेकर) :** राज्यातील २९ महानगरपालिकांसाठी १५ जानेवारीला मतदान झालं, तर १६ जानेवारीला मतमोजणी झाली. यानंतर आता महापालिकेमधील महपौरपदाच्या आरक्षण सोडतीबाबत एक महत्त्वाची माहिती समोर आली आहे. सर्व २९ महानगरपालिकांमधील महापौरपदाच्या आरक्षणाची सोडत २२ जानेवारीला काढली जाणार आहे. २२ जानेवारीला सकाळी ११ वाजता सर्व महापालिकांसाठी महापौरपदाची आरक्षण सोडत काढली जाणार आहे. त्यामुळे कोणत्या प्रवर्गाचा महापौर कोणत्या महानगरपालिकेमध्ये बसणार हे २२ जानेवारीला निश्चित होईल. नगरविकास विभागाकडून महापौरपदाच्या आरक्षणाची सोडत मंत्रालयात काढली जाईल. २९ महापालिका निवडणुकांचे निकाल जाहीर झाले. त्यात बहुतांश महापालिकेत महायुतीतील पक्ष सरस ठरले. निवडणूक निकाल जाहीर झाल्यानंतर आता सर्वांच्या मनात एकच प्रश्न आहे की, नवा महापौर नेमका कधी आणि कसा निवडला जाणार? याबाबतची नावं कधी समोर येणार? महापौर कोण होणार यासाठी सोडतीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच राजकीय पक्षांकडून उमेदवार ठरवला जातो. महापौर निवडीसाठी सोडतीची प्रक्रिया राज्य सरकारकडून केली जाते. महापालिकांच्या महापौरांची निवड थेट जनतेतून होत नाही. त्यासाठी एक विशिष्ट निवड प्रक्रिया पार पाडली जाते. नगरविकास विभागाकडून महापौर पदासाठी आरक्षणाची सोडत काढण्यासाठी नोटीफिकेशन काढलं जातं. त्यानुसार सर्व महापालिकेतील महापौर पदासाठी सोडत काढण्यात येते. या सोडतीमध्ये खुला प्रवर्ग, राखीव, महिला अशा प्रकारच्या वर्गांचा समावेश असतो. पान २ वर

## मुंबई पोलिसांच्या 'हाऊसिंग टाऊनशिप' प्रकल्पाला मंजूरी!



### ४५ हजार कुटुंबांना मिळणार हक्काचा निवारा

▮ **मुंबई (प्रथमेश चव्हाण) :** मुंबई शहर आणि उपनगरातील पोलिसांच्या निवासाचा गंभीर प्रश्न मार्गी लावण्यासाठी राज्य सरकारने एक ऐतिहासिक पाऊल उचलले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत "मुंबई पोलीस हाऊसिंग टाऊनशिप" प्रकल्पाच्या प्रस्तावाला अधिकृत मंजुरी देण्यात आली. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पामुळे मुंबई पोलीस दलातील हजारो कर्मचाऱ्यांच्या हक्काच्या घराचे स्वप्न पूर्ण होणार आहे. मुंबई पोलीस दलात सध्या ५१ हजार ३०८ पेक्षा जास्त कर्मचारी कार्यरत आहेत. मात्र, त्यांच्या राहण्याच्या व्यवस्थेत अनेक अडचणी आहेत: सध्याची बहुतांश निवासस्थाने ब्रिटीशकालीन असून ती जुनी आणि जीर्ण झाली आहेत. उपलब्ध २२ हजार ९०४ घरांपैकी सुमारे ३ हजार ७७७ घरे राहण्यायोग्य नाहीत. स्वतःचे घर उपलब्ध नसल्याने अनेक पोलिसांना दररोज लांबचा प्रवास करून कर्तव्यावर यावे लागते. या नवीन प्रकल्पामुळे पोलिसांना त्यांच्या कार्यालयाजवळच आधुनिक सोयीसुविधांनी युक्त घरे मिळतील. पोलिसांच्या कामाचे स्वरूप आणि आपत्कालीन परिस्थिती पाहता, त्यांना कामाच्या ठिकाणाजवळ राहणे आवश्यक असते. पान २ वर

### प्रकल्पाचे स्वरूप आणि खर्च

- हा प्रकल्प सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राज्य पायाभूत सुविधा महामंडळाच्या माध्यमातून राबवला जाणार आहे.
- क्षेत्रफळ: या टाऊनशिप अंतर्गत सुमारे ५ कोटी चौरस फूट क्षेत्राचा विकास केला जाईल.
- खर्च: या भव्य प्रकल्पासाठी साधारणपणे २० हजार कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे.
- निधी: एकूण खर्चापैकी ३० टक्के रक्कम शासन देणार असून, उर्वरित ७० टक्के निधी वित्तीय संस्थांकडून कर्जाच्या स्वरूपात उभारला जाईल. या कामाची सुरुवात करण्यासाठी १०० कोटी रुपयांचा प्राथमिक निधी मंजूर करण्यात आला आहे.

## मुंबईत उभं राहणार ३० मजली 'बिहार भवन'! ३१४ कोटी मंजूर

▮ **मुंबई (विशाल कारंडे) :** मुंबईत येणाऱ्या बिहारी नागरिकांसाठी देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईत आधुनिक सुविधांनी सज्ज 'बिहार भवन' उभारण्यात येणार असून, त्यामुळे विद्यार्थी आणि रुग्णांसह अनेकांना आधुनिक सुविधा मिळणार आहेत. हे बिहार भवन मुंबईतील एलिफिंस्टन एस्टेट परिसरात, मुंबई पोर्ट ट्रस्टच्या जागेत उभं राहणार आहे. दिल्लीतील बिहार भवनाच्या धर्तीवर ही इमारत उभारली जाणार आहे. यासाठी बिहार सरकारच्या मंत्रिपरिषदेनं १३ जानेवारी रोजी ३१४ कोटी २० लाख रुपयांची प्रशासकीय मंजुरी दिली आहे. उपलब्ध माहितीनुसार, हे बिहार भवन सुमारे २७५२.७७ चौरस मीटर (सुमारे ०.६८ एकर) जागेवर उभारण्यात येईल. बेसमेंटसह ही इमारत सुमारे ३० मजली असेल आणि जमिनीपासून तिची उंची सुमारे ६९ मीटर असेल. आधुनिक वास्तुकलेचा वापर करून या इमारतीचे डिझाइन तयार केले जाणार आहे. या बिहार भवनात एकूण १७८ खोल्या असणार आहेत. मुंबईत सरकारी कामासाठी, बैठकींसाठी किंवा अधिकृत कारणांसाठी येणाऱ्या बिहारमधील नागरिकांना येथे राहण्याची सुविधा मिळणार आहे. याशिवाय विविध विभागांसाठी कार्यालयं आणि आधुनिक हॉलचीही उभारणी केली जाणार आहे. मुंबईत विशेषतः कर्करोगासारख्या गंभीर आजारांच्या उपचारासाठी बिहारमधून मोठ्या संख्येने रुग्ण येतात. त्यांची आणि त्यांच्या नातेवाईकांची अडचण लक्षात घेऊन येथे २४० बेड क्षमतेची डॉर्मेट्री तयार केली जाणार आहे. पान २ वर




- ३० मजली इमारत
- १७८ खोल्या, सरकारी कामांसाठीही सुविधा
- रुग्ण आणि नातेवाईकांसाठी २४० बेडची डॉर्मेट्री
- २३३ वाहनांसाठी स्मार्ट पार्किंग
- विद्यार्थ्यांनाही होणार फायदा
- कॉन्फरन्स हॉल, कॅफेटेरिया आणि मेडिकल रूम

## प्रजासत्ताक दिन संचलनात महाराष्ट्राचा 'गणेशोत्सव'



▮ **नवी दिल्ली (प्रगती शर्मा) :** ७७ व्या प्रजासत्ताक दिन सोहळयासाठी राजधानी नवी दिल्ली सज्ज झाली आहे. राष्ट्रीय गीत 'वंदे मातरम्' ला १५० वर्षे पूर्ण होत असल्याच्या निमित्ताने यंदा हा सोहळा ऐतिहासिक ठरणार आहे. या भव्य संचलनात महाराष्ट्राचा चित्ररथ 'गणेशोत्सव : आत्मनिर्भरतेचे प्रतीक' या संकल्पनेतून राज्याची परंपरा आणि आर्थिक शक्तीचे दर्शन अवघ्या जगाला घडवणार आहे. संरक्षण सचिव राजेश कुमार सिंह यांनी या सोहळयाच्या तयारीची अधिकृत माहिती दिली. यंदाच्या सोहळयाला युरोपियन कौन्सिलचे अध्यक्ष अँटोनियो कोस्टा आणि युरोपियन कमिशनच्या अध्यक्षा उर्सुला वॉन डेर लेयन हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. त्यांच्या उपस्थितीत कर्तव्यपथावर भारताच्या लष्करी सामर्थ्यासोबतच सांस्कृतिक समृद्धीचे प्रदर्शन होईल. यंदाच्या संचलनात सहभागी होणाऱ्या एकूण ३० चित्ररथांमध्ये महाराष्ट्राचा चित्ररथ आकर्षणाचे केंद्र ठरणार आहे. लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवातून जी सामाजिक क्रांतीची बीजे पेरली, तीच चळवळ आज आधुनिक भारताला कशी 'आत्मनिर्भर' बनवत आहे, याचे प्रभावी चित्रण यात पाहायला मिळेल. गणेशोत्सवाच्या माध्यमातून होणारी कोट्यवधींची आर्थिक उलाढाल, मूर्तिकार आणि सजावट कलाकारांना मिळणारा रोजगार आणि त्यातून विणली गेलेली आर्थिक साखळी या चित्ररथातून मांडली जाणार आहे. तसेच, महाराष्ट्राची अस्मिता असलेली ढोल-ताशा पथके आणि सामाजिक एकात्मता यातून 'एक भारत, श्रेष्ठ भारत'चा संदेश दिला जाईल. लष्करी ताकदीच्या प्रदर्शनात यंदा प्रथमच 'बॅटल ॲरे' (Battle Array) ही युद्ध रचना प्रदर्शित केली जाणार आहे. यामध्ये अर्जुन टँक, टी-९० भीष्म, राफेल विमाने आणि स्वदेशी बनावटीच्या अत्याधुनिक शस्त्रास्त्रांचे चित्तथरारक दर्शन घडवले जाईल. संचलनात १८ लष्करी तुकड्या आणि १३ बँड्ससह एकूण ३० चित्ररथ सहभागी होतील. पान २ वर

## मंत्रिमंडळाचा निर्णय; नवी मुंबई तिरूपती देवस्थानाला अवघ्या १ रुपयात ३.६ एकर जमीन

▮ **मुंबई (राकेश गायकवाड) :** देशातील सर्वात श्रीमंत देवस्थान म्हणून ओळखल्या जाणाऱ्या तिरुमला तिरूपती देवस्थानम बोर्डला नवी मुंबईत पद्मावती अम्मावरी मंदिर उभारण्यासाठी केवळ प्रति चौरस मीटर नाममात्र एक रुपयात ३.६ एकरचा भूखंड देण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. तिरुमला तिरूपती देवस्थानमला पद्मावती अम्मावरी मंदिर उभारण्यासाठी नवी मुंबईच्या उलवे नोडमधील सेक्टर १२ मधील ३.६ एकरचा भूखंड देण्याचा निर्णय २९ फेब्रुवारी २०२४ रोजी घेण्यात आला होता. यासाठी सिडको महामंडळाच्या भूमुल्य आणि भूविनियोग धोरणानुसार या भूखंडास किंमत आकारण्यात यावी असा निर्णय सरकारने घेतला होता. मात्र आता तिरुमला तिरूपती देवस्थानम् बोर्डने व्यंकटेश्वरा मंदिर उभारण्यासाठी वाटप करण्यात आलेल्या भूखंडाच्या प्रमाणेच पद्मावती अम्मावरी मंदिर उभारण्यासाठीही एक रुपया प्रति चौरस मीटर दराने भूखंड देण्याची तसेच इतर शुल्क सेवाकरासह माफ करावे, अशी विनंती सिडको महामंडळाकडे केली होती. त्यानुसार सिडको महामंडळाने याबाबतचा ठराव करून प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी पाठवला होता. पद्मावती अम्मावरी देवीचे मूळ मंदिर तिरूपतीजवळील तिरूचानूर येथे आहे. हे मंदिर भगवान व्यंकटेश्वराच्या बरोबरीनेच भाविकांचे श्रध्दास्थान आहे. पद्मावती अम्मावरी देवीची अमरावती, विजयनगरम (आंध्र प्रदेश), हैदराबाद, भुवनेश्वर, चेन्नई, बंगळूर, कुरूक्षेत्र, नवी दिल्ली, जम्मू येथे मंदिर आहेत. पान २ वर



संपादकीय



संपादक : राकेश शंकर गोरे

# लोकसहभाग हवा

कोविड महासाथीने देशातील सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेला झालेल्या मोठ्या आजाराचेही निदान केले. या महासाथीला तोंड देण्याचे बरेच प्रयत्न महाराष्ट्रात होऊनही, आरोग्य यंत्रणा सक्षम होऊ शकली नाही. भारतात जगातील सर्वाधिक करोना रुग्ण आढळले आणि महाराष्ट्रात नोंदवल्या गेलेल्या बळींची संख्या सर्वाधिक ठरली. दुसऱ्या बाजूला या काळात कॉर्पोरेट रुग्णालयांनी सरकारी दर नियंत्रणाची बंधने सर्रास धुडकावून भरमसाट दर आकारणी केली. ही रुग्णालये एरवीही सरकारी सवलतींची माहिती रुग्णांना देतातच असे नाही. कित्येक कुटुंबे उपचारांच्या खर्चापायी कर्जबाजारी होतात, दारिद्र्य रेषेखाली ढकलली जातात. या भयानक अनुभवातून जागे होऊन काही वर्षांत सार्वजनिक आरोग्य सेवा बळकट करण्याची व खासगी सेवांवर नियंत्रण ठेवण्याची मागणी पुढे येत आहे. भारतात गेल्या २५ वर्षांत मोठ्या खासगी कॉर्पोरेट रुग्णालयांची वाढ होत गेली. मुंबई हे देशातील सर्वांत जास्त पंचतारांकित रुग्णालये असलेले शहर आहे. शिवाय गल्लोगल्ली खासगी शुश्रूषालये (नर्सिंग होम ) व प्रसूतिगृहांचे पेव फुटले आहे. या रुग्णालयांमध्ये भरमसाट दर आकारून रुग्णांची प्रचंड लूट केली जाते. मुंबईसारख्या शहरात जवळपास ५० टक्के जनता कष्टकरी, दाट वस्तीच्या वस्त्यांत राहणारी आहे. सार्वजनिक आरोग्य सेवा शासनाच्या दीर्घकालीन दुर्लक्षामुळे अपुऱ्या व अकार्यक्षम आहेत. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल असणाऱ्यांना नाइलाजाने खासगी रुग्णालयांचा आधार घ्यावा लागतो. या खासगी आरोग्य यंत्रणांत तिथले दर व आरोग्य सेवांवर सरकारचे नियंत्रण व नियमन कागदोपत्रीच उरते. 'पंतप्रधान जन आरोग्य योजना' म्हणजे विमा कंपन्यांच्या नफेखोरीला वाव देणारी व खासगी रुग्णालयांचे उखळ पांढरे करणारी योजना ठरली. यातून जनतेचा पैसा खासगी रुग्णालयांना देऊन सरकारी पैशांचा गैरवापर केला जात आहे. यासाठी 'महाराष्ट्र नर्सिंग होम्स रजिस्ट्रेशन ॲक्ट'मध्ये सुधारणा करावी व सर्व खासगी रुग्णालयांना त्यातील नियमांची काटकोर अंमलबजावणी करणे भाग पाडावे- दर नियंत्रण, शुल्क व रुग्ण हक्काची सनद योग्य ठिकाणी प्रदर्शित करणे, पारदर्शक बिलिंग, रुग्णांना गरज नसताना ताब्यात न ठेवणे, प्रभावी आणि सुलभ तक्रार निवारण यंत्रणा, कमी उत्पन्न असलेल्या रुग्णांना धर्मादाय रुग्णालयांमध्ये मोफत उपचार मिळणे इत्यादी तरतुदी अमलात आणाव्यात. 'क्लिनिकल एस्टॅब्लिशमेंट ॲक्ट' लागू करावा व त्यातून लोकआधारित देखरेख प्रक्रिया राबवावी अशा मागण्या अनेक संघटना व तज्ज्ञ करीत आहेत. अनेक क्षेत्रांतील सार्वजनिक उपक्रमांचे खासगीकरण करण्याकडे सत्ताधाऱ्यांचा कल गेल्या तीन दशकांपासून दिसतो. हे वारे आरोग्याच्या क्षेत्रातही शिरले आहे. वास्तविक आरोग्य सेवा उपलब्ध असणे संविधानाच्या कलम २१ नुसार जीविताच्या मूलभूत हक्काचा भाग आहे आणि ७४ व्या घटनादुरुस्तीनुसार सार्वजनिक रुग्णालये उपलब्ध करून देणे आणि ती चालवणे ही स्थानिक शासनाची जबाबदारी आहे. काल- परवापर्यंत या सेवा करदात्यांच्या पैशातून मोफत वा अत्यल्प दरांत पुरवल्या जात होत्या. आता खासगीकरणामुळे आरोग्य सेवा गरीब व वंचित जनतेच्या आवाक्याबाहेर चालल्या आहेत. महाराष्ट्रात पुणे, मुंबईसारख्या शहरांत खासगीकरणाला वेग आला आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेने गेल्या काही महिन्यांत सहा बहुविशेषज्ञ उपनगरी रुग्णालये आणि पाच रक्तपेढ्यांचे खासगीकरण करण्याचे जाहीर केले. सार्वजनिक-खासगी भागीदारीच्या (पीपीपी- पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप) नावाखाली सध्या मुंबईत आयसीयू, निदान केंद्रे, डायलिसिस युनिट्स आणि प्रसूतिगृहे असे २० हून अधिक प्रकल्प कार्यरत आहेत. तज्ज्ञांच्या अभ्यासानुसार या पीपीपी प्रकल्पांमुळे सेवांची गुणवत्ता किंवा उत्तरदायित्व वाढते असे आढळलेले नाही. उलट पीपीपी मॉडेलचे गंभीर दोष उघड झाले आहेत. या माध्यमातून कोणताही वैद्याकीय अनुभव नसलेले ठेकेदार सार्वजनिक आरोग्य यंत्रणेतील आयसीयू आणि प्रसूती सेवेत घुसत आहेत. या सेवेत असणाऱ्या कर्मचाऱ्यांना कमी वेतन दिले जाते. त्यामुळे सेवेची गुणवत्ता आणि उत्तरदायित्व दोन्ही कमी होतात. खासगी कंपन्यांनी आऊटसोर्स केलेल्या आयसीयूमध्ये अपात्र डॉक्टर असून, काही ठिकाणी होमिओपॅथी डॉक्टरांकडून आयसीयू सेवा चालवल्या जात आहेत! अनेक ठिकाणी पुरेसे डॉक्टर उपलब्ध नसल्याने आयसीयू कार्यरत नाहीत आणि रुग्णांना बेड मिळत नाहीत. पीपीपी संचालित 'निदान केंद्रां'मध्ये सार्वजनिक दरांच्या तुलनेत तीन ते पंधरा पट जास्त शुल्क आकारले जाते. तरीही पीपीपी मॉडेल पुढे रेटले जात आहे. कारण यातील कंत्राटांमध्ये काही राजकीय नेते, नगरसेवक आणि त्यांच्या नातेवाईकांचे हितसंबंध गुंतलेले आहेत. एकंदरीत हा व्यवहार लोकहिताऐवजी हितसंबंधींच्या नफेखोरीचा व्यवसाय होत आहे. या सर्व प्रकारच्या पीपीपी मॉडेलला जनतेकडून मोठ्या प्रमाणावर विरोध सुरू झाला आहे. मुंबईतील गरीब व कामगार वस्त्या असलेल्या भागातील जनतेने या महागड्या, जनहितविरोधी व अकार्यक्षम योजनांविरुद्ध आंदोलने सुरू केली आहेत. 'अस्पताल बचाओ, निजीकरण हटाओ कृती समिती'ने मानखुर्द - गोवंडी परिसरात शताब्दी आणि लालुभाई कंपाऊंड सुपर स्पेशालिटी रुग्णालयांच्या खासगीकरणाविरुद्ध मोठे जनआंदोलन उभे केले आहे. भगवती रुग्णालय, एम.टी. अगरवाल रुग्णालय, इ. रुग्णालयांच्या उपनगरीय परिसरांतून तसेच व मुंबईच्या इतर भागांमधूनही विरोध सुरू झाला आहे. हा गरीब कष्टकरी जनतेने खासगीकरणाच्या धोरणाला दिलेला स्पष्ट नकार आहे. हा विरोध करीत असतानाच, सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेच्या बळकटीकरण व विस्तारीकरणाची मागणीही केली जात आहे.

# ‘हिंद-दी-चादर’ श्री गुरु तेगबहादुर साहिबजी यांच्या शहीदी समागम कार्यक्रमात सेवेच्या माध्यमातून साक्षीदार होऊ या

भारतीय इतिहासात धर्म, मानवता, त्याग आणि बलिदान यांचे अद्वितीय प्रतीक म्हणून श्री गुरु तेगबहादुर साहिबजी यांचे नाव अजरामर आहे. धर्मस्वातंत्र्य, मानवमूल्ये आणि सत्यासाठी प्राणार्पण करणारे गुरु तेगबहादुर “हिंद-दी-चादर” म्हणून ओळखले जातात. त्यांच्या या महान शहिदीच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त नांदेड शहरात २४ व २५ जानेवारी रोजी एक भव्य, ऐतिहासिक आणि आध्यात्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. हा भव्य समागम असर्जन परिसरातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ५३ एकर विस्तीर्ण मैदानावर होणार आहे. देश-विदेशातून जवळपास १० लाखांहून अधिक भाविक या पवित्र समागम कार्यक्रमासाठी नांदेडमध्ये दाखल होणार आहेत. हा केवळ धार्मिक कार्यक्रम नसून सेवा, समानता आणि मानवतेचा महासंगम ठरणार आहे.



**नऊ समाजांचा ऐतिहासिक सहभाग**

या ऐतिहासिक शहीदी समागमाचे आयोजन नऊ समाजांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे. राज्य शासनाचा अल्पसंख्याक विभाग, “हिंद-दी-चादर” श्री गुरु तेगबहादूर साहिबजी ३५० वी शहीदी समागम समिती तसेच सीख, सिकलीकर, बंजारा, लबाना, मोहियाल, सिंधी, वाल्मिकी, उदासीन संप्रदाय आणि भगत नामदेव वारकरी समाज या सर्व समाजांनी एकत्र येत एकतेचा आणि समतेचा आदर्श समाजासमोर ठेवला आहे. ही संयुक्त रचना स्वतः गुरूच्या विचारांची जिवंत साक्ष आहे. “सर्व धर्म समान, सर्व मानव समान” हा संदेश या आयोजनातून ठळकपणे अधोरेखित होतो.

**मुख्य मंडप, अनवाणी चालण्याची परंपरा आणि श्रद्धेचा सन्मान**

कार्यक्रम स्थळी उभारण्यात येणाऱ्या मुख्य मंडपात दोनही दिवस श्री गुरु ग्रंथसाहिब विराजमान राहणार आहेत. गुरूच्या चरणी नतमस्तक होण्यासाठी येणारे सर्व भाविक, मान्यवर, पदाधिकारी व अतिथी कार्यक्रम स्थळी अनवाणी चालणार आहेत. ही परंपरा केवळ धार्मिक शिस्त नसून अहंकार त्याग, नम्रता आणि गुरूचरणी समर्पणाची भावना व्यक्त करणारी आहे. लाखो भाविक अनवाणी चालत गुरूच्या दर्शनासाठी येणार, हे दृश्यच सेवेतून भक्तीचा खरा अर्थ उलगडून दाखवणारे ठरणार आहे.तसेच संत शिरोमणी श्री नामदेव महाराज यांचे जन्म गाव नरसी नामदेव येथून वारकरी दिंड्या पायी चालत नांदेड येथे समागम स्थळी येणार आहेत.

**श्रमदानातून उभी राहणारी सेवा संस्कृती**

या कार्यक्रमाच्या पूर्वतयारीचा एक अत्यंत प्रेरणादायी प्रसंग म्हणजे नुकतेच पार पडलेले भव्य श्रमदान. नांदेडचे जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांच्या उपस्थितीत कार्यक्रम स्थळी श्रमदान करण्यात आले. मैदानावरील खडे उचलणे, जमिनीची स्वच्छता करणे, चालण्यासाठी सुरक्षित व्यवस्था करणे ही सर्व कामे सेवाभावाने करण्यात आली. प्रशासन, विद्यार्थी,स्वयंसेवक आणि भाविकांनी एकत्र येऊन केलेले हे श्रमदान सेवेतून भक्तीचा प्रत्यक्ष अनुभव देणारे ठरले. गुरूच्या शिकवणीनुसार सेवा हीच खरी साधना असल्याचा संदेश या उपक्रमातून समाजापर्यंत पोहोचला.

**लंगर : समानतेचा आणि मानवतेचा महासागर**

या भव्य शहीदी समागमात भाविकांच्या सोयीसाठी १२ भव्य लंगर उभारण्यात येणार आहेत. प्रत्येक लंगरमध्ये एकावेळी सुमारे ३ हजार भाविक बसून भोजन करू शकतील, अशी उत्कृष्ट व्यवस्था करण्यात आली आहे. २४ व २५ जानेवारी रोजी हे लंगर सकाळी ८ वाजल्यापासून रात्री १२ वाजेपर्यंत अखंड सुरू राहणार आहे. लंगर म्हणजे केवळ अन्नसेवा नाही, तर समानतेची शिकवण आहे. येथे जात, धर्म, भाषा, देश, श्रीमंती-गरिबी यांचा कोणताही भेद न ठेवता सर्वजण एकाच पंक्तीत बसून गुरूचा प्रसाद स्वीकारणार आहेत. हा दृश्य अनुभव गुरू नानक देवजींच्या “सर्व मानव समान आहेत” या विचाराचा साक्षात्कार घडवणारा असेल.

**विनामूल्य सेवा स्टॉल**

कार्यक्रम स्थळाच्या चारही बाजूंनी दोन किलोमीटरपर्यंतच्या परिसरात चहा, पाणी, नाश्ता, फळे यांचे विनामूल्य सेवा स्टॉल उभारण्यात येणार आहेत. ही व्यवस्था लाखो भाविकांच्या सोयीसाठी असून, निःस्वार्थ सेवेचा सर्वोच्च आदर्श समाजासमोर ठेवणारी आहे. सेवा करताना कोणताही मोबदला, मान-सन्मान किंवा प्रसिद्धी अपेक्षित नसून, केवळ गुरूच्या नावाने सेवा करण्याचा आनंद स्वयंसेवक अनुभवणार आहेत.

**जुताघर : नम्रतेचा आणि अहंकारत्यागाचा संस्कार**

कार्यक्रम स्थळी ८ प्रवेशद्वारांवर ८ जूताघरे उभारण्यात येणार असून, गरजेनुसार त्यांची संख्या वाढवण्यात येणार आहे. लाखो भाविकांच्या पादत्राणांची काळजी घेणे ही एक मोठी जबाबदारी असून, ती सेवा अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने पार पाडली जाणार आहे. जूताघर सेवा म्हणजे अहंकाराचा त्याग आणि नम्रतेची साधना. गुरूच्या दरबारात प्रवेश करताना पादत्राणे बाहेर ठेवणे म्हणजे बाह्य वैभव आणि गर्व दारातच ठेवणे होय. ही सेवा माणसाला अंतर्मुख करते आणि समानतेचा खरा अर्थ शिकवते.

**गतका, परंपरा आणि शौर्याचे दर्शन**

या शहीदी समागमात शीख धर्मीयांचा पारंपरिक युद्धकला प्रकार ‘गतका’ सादर करण्यात येणार आहे. यामध्ये पारंपरिक शस्त्रांचे प्रदर्शन, शौर्य, शिस्त आणि युद्धकलेचे प्रात्यक्षिक पाहायला मिळणार आहे. तसेच नऊ समाजांच्या वतीने पारंपरिक कीर्तन, कथा आणि धार्मिक प्रवचनांचे आयोजन करण्यात येणार असून, त्यातून गुरूच्या जीवनकार्याचा आणि बलिदानाचा संदेश नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्यात येणार आहे. या सामागमासाठी दिल्ली, अमृतसर, चंदीगड, मुंबई, हैद्राबाद येथून रेल्वे सेवा उपलब्ध राहणार असून विशेष विमानसेवाही दोन्ही दिवस असणार आहे. तसेच कार्यक्रमाच्या ठिकाणी दहा हजार भाविकांच्या निवासासाठी सर्व सुविधायुक्त आदर्श टेन्ट सिटी उभी करण्यात येणार आहेत

**हेलिकॉप्टरद्वारे पुष्पवृष्टी : श्रद्धेचा अभिषेक**

या ऐतिहासिक कार्यक्रमात हेलिकॉप्टरद्वारे पुष्पवृष्टी करण्यात येणार आहे. गुरूच्या प्रतिकृतीवर आणि भाविकांवर होणारी ही पुष्पवृष्टी म्हणजे श्रद्धेचा, सन्मानाचा आणि कृतज्ञतेचा अभिषेक असेल.

**सेवेतून इतिहासाचे साक्षीदार होऊ या**

नांदेड येथे होणारा हा ३५० वा शहीदी समागम म्हणजे केवळ एक धार्मिक कार्यक्रम नसून, सेवा, समानता, बलिदान आणि मानवतेचा महासोहळा आहे. “हिंद-दी-चादर” श्री गुरु तेगबहादूर साहिबजी यांचा संदेश आजही तितकाच जिवंत असून, तो या भव्य आयोजनातून संपूर्ण जगाला पुन्हा एकदा दिशा देणार आहे.तसेच या कार्यक्रमासाठी विविध राज्यांचे मुख्यमंत्री, बागेश्वरचे आचार्य , महंत आदी उपस्थित राहणार आहे. चला तर मग, या गौरवशाली ऐतिहासिक कार्यक्रमाचे साक्षीदार बनूया, सेवेत सहभागी होऊया आणि गुरूच्या चरणी आपली सेवा अर्पण करण्यासाठी सज्ज होऊया.

अलका पाटील
उपसंपादक
जिमाका,नांदेड

# २०६ रुग्णालयांमध्ये आता आयुष्मान भारत–महात्मा फुले योजना लागू

**पुणे (अभिजीत येरल्लू) :** आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेंतर्गत असलेल्या उपचारांची संख्या वाढविण्यात आल्याने सर्वसामान्यांना दिलासा मिळाला आहे. योजना समाविष्ट असलेल्या पुणे जिल्ह्यातील रुग्णालयांची संख्या ६८ वरून २०६ करण्यात आली आहे. गेल्या वर्षभरात या योजनेंतर्गत सुमारे ४२ हजार रुग्णांवर उपचार करण्यात आले आहेत. यामध्ये हृदयविकारावरील उपचार आणि शस्त्रक्रिया तसेच अस्थिरोग शस्त्रक्रियांची संख्या सर्वाधिक आहे. आयुष्मान भारत-महात्मा फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत राज्य शासनाने प्रत्येक कुटुंबाचा ५ लाख रुपयांचा विमा उतरविला आहे. योजनेचा लाभ घेण्यासाठी आत्तापर्यंत उत्पन्न आणि रेशन कार्डांची मर्यादा होती. आता




जिल्ह्यातील कोणत्याही उत्पन्न गटातील नागरिकाला योजनेचा लाभ घेता येणे शक्य आहे. कागदपत्रांची पूर्तता केल्यास रुग्णांना ५ लाख रुपयांपर्यंतचे उपचार मोफत मिळू शकणार आहेत. योजनेमध्ये आत्तापर्यंत जिल्ह्यातील ६८ रुग्णालयांचा समावेश होता. आता ही संख्या २०६ पर्यंत वाढविण्यात आली आहे. योजनेंतर्गत १३५६ प्रकारचे उपचार मोफत पुरविण्याची तरतूद करण्यात आली आहे. महात्मा फुले योजनेअंतर्गत उपचारांची संख्या वाढत असली, तरी आयुष्मान भारत कार्डचे उद्दिष्ट गाठण्यात अद्याप समाधानकारक यश मिळालेले नाही. कार्ड वाटपासाठी ६६ लाख ४८ हजार ५९५ लाभार्थींचे उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे. त्यापैकी १९ लाख ४६ हजार जणांना म्हणजे केवळ २९ टक्के नागरिकांना कार्ड वाटप झाले आहे. तसेच, ४७ लाख २ हजार नागरिक म्हणजे ७१ टक्के उद्दिष्ट अद्याप पूर्ण झालेले नाही.

पान १ वरून...

## मंत्रिमंडळाचा निर्णय;...

उलवे येथेही पद्मावती अम्मावरी देवीचे मंदिर उभारल्यास पर्यटनालाही चालना मिळण्याची शक्यता आहे. मंदिर पर्यटकांचे आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरुन संबंधित परिसराला धार्मिक आणि सामाजिक महत्व प्राप्त होण्याची शक्यता आहे. संबंधित देवस्थानामार्फत परिसरात अनेक सामाजिक उपक्रम हाती घेतले जाणार आहेत. त्यामुळे तिरुमला तिरूपती देवस्थानम बोर्डला पद्मावती अम्मावरी मंदिर उभारण्यासाठी वाटप केलेला भूखंड एक रुपया प्रति चौरस मीटर दराने देण्यात यावा, अशा निर्णयास मान्यता देण्यात आली.

## प्रजासत्ताक दिन...

२,५०० कलाकारांच्या सांस्कृतिक सादरीकरणाला ऑस्कर विजेते संगीतकार एम.एम. कीरावानी यांचे संगीत आणि ज्येष्ठ अभिनेते अनुपम खेर यांचा भारदस्त आवाज लाभणार आहे. यंदाचा सोहळा ‘जनभागीदारी’वर आधारित असून, १०,००० विशेष पाहुण्यांना निमंत्रित करण्यात आले आहे. यात इस्रोचे शास्त्रज्ञ, लखपती दीदी आणि प्रगत शेतकऱ्यांचा समावेश आहे. नागरिकांच्या सुविधेसाठी ‘राष्ट्रपर्व’ हे विशेष पोर्टल आणि ॲप विकसित करण्यात आले असून, तिकीटधारकांसाठी दिल्ली मेट्रोचा प्रवास मोफत ठेवण्यात आला आहे. संचलनानंतर २६ ते ३१ जानेवारी दरम्यान लाल किल्ल्यावर ‘भारत पर्व’चे आयोजन करण्यात आले असून, तिथेही महाराष्ट्राच्या संस्कृतीचा आस्वाद घेण्याची संधी देशवासियांना मिळणार आहे.

## मुंबईत उभं राहणार ३०...

त्यामुळे रुग्णांना सुरक्षित, सोयीस्कर आणि तुलनेने किफायतशीर राहण्याची सुविधा मिळणार आहे. मुंबईत पार्किंगची मोठी समस्या असते. त्यामुळे या इमारतीत सेंसर आधारित स्मार्ट ट्रिपल आणि डबल डेकर पार्किंग व्यवस्था करण्यात येणार आहे. यामध्ये एकाच वेळी २३३ गाड्या पार्क करता येतील, अशी सुविधा असेल. फक्त उपचारासाठीच नाही, तर अभ्यास आणि स्पर्धा परीक्षांसाठी मुंबईत येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीही इथे राहण्याची सोय असेल. मेडिकल, इंजिनिअरिंग, बँकिंग, रेल्वे, यूपीएससी किंवा इतर परीक्षांसाठी मुंबईत येणाऱ्या विद्यार्थ्यांना येथे किफायतशीर दरात सुरक्षित निवासाची सोय असणार आहे. या बिहार भवनात ७२ जण बसू शकतील असा कॉन्फरन्स हॉल, कॅफेटेरिया, मेडिकल रूम आणि इतर आवश्यक सोयी विकसित केल्या जाणार आहेत. यामुळे सरकारी बैठकांसोबतच सर्वसामान्य लोकांनाही फायदा होणार आहे. दरम्यान, संबंधित विभागाच्या माहितीनुसार या प्रकल्पासाठी लवकरच निविदा प्रक्रिया (टेंडर) सुरू करण्यात येणार आहे. एकूणच मुंबईत येणाऱ्या बिहारमधील नागरिकांसाठी हे बिहार भवन महत्त्वाचे असणार आहे.

## मुंबई पोलिसांच्या...

सुसज्ज वसाहती मिळाल्यामुळे पोलीस दलातील अधिकारी आणि कर्मचारी अधिक तत्परतेने आणि कार्यक्षमतेने आपले कर्तव्य बजावू शकतील, असा विश्वास सरकारने व्यक्त केला आहे. सरकारच्या या निर्णयामुळे पोलीस दलात आनंदाचे वातावरण पसरले आहे.

## महापौर निवडीचा मार्ग...

ज्या ठिकाणी जी सोडत निघते त्यानुसार महापौर पदाची निवड केली जाते. जसं मुंबईत ज्या पक्षाकडं किंवा युतीकडं ११४ पेक्षा जास्त नगरसेवक आहेत, त्यांचाच महापौर निवडला जातो. हे पद खुल्या प्रवर्गासाठी आहे की राखीव, हे या सोडतीवरून स्पष्ट होईल. त्यानंतर महापौर आणि उपमहापौर पदासाठी अर्ज भरले जातात आणि महापालिकेच्या सभागृहात मतदान होऊन नव्या महापौरांची घोषणा केली जाते.

## आता ९ रुपयांत मेट्रो...

आठवड्याच्या कामकाजाच्या दिवसांत दैनंदिन प्रवासीसंख्या आता दीड लाखांच्या घरात पोहोचली असून, काही दिवसांत तर विक्रमी गर्दीही पाहायला मिळाली आहे. या वाढत्या प्रवाहामुळे ‘लास्ट माईल कनेक्टिव्हिटी’ ही मेट्रोसमोरील सर्वात मोठी गरज ठरली होती. बीकेसी, वरळी, आरे, जेव्हीएलआर आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ही पाच महत्त्वाची स्थानकं या नव्या बससेवेत महत्वाची असणार आहेत. कार्यालयीन वेळेत या ठिकाणी प्रवाशांची प्रचंड गर्दी असते. त्यामुळे गर्दीच्या वेळेत दर १० मिनिटांनी एसी बस उपलब्ध करून देण्याची योजना आखण्यात आली आहे. कमी खर्च, अधिक आराम आणि वेळेची बचत, या तिन्ही गोष्टी एकाच प्रवासात मिळाल्याने मुंबईकरांच्या दैनंदिन धावपळीत मोठा बदल घडणार आहे. मेट्रोचा प्रवास जितका सोपा, तितकाच स्टेशनबाहेरचाही प्रवास सुलभ करण्याच्या दिशेने टाकलेलं हे पाऊल महत्त्वाचं मानलं जात आहे.

### वसई-विरार शहर महानगरपालिका

प्रभाग समिती (ई) नालासोपारा (पश्चिम)
मुख्य कार्यालय विरार
दुरध्वनी क्र. १२२५० - २४०२१७१ / २४०२५६३

जावक क्र.:-व.वि.श.म./क.वि./००५/२५-२६
दिनांक :- 19-1-26

**जाहिर नोटीस**

महाराष्ट्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६१ अन्वये जाहिर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांतरण संबंधाने वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यालय नालासोपारा येथे प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरणपरत्वे नोटीसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणत्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसाच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यालय नालासोपारा येथे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी अन्यथा करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन महानगरपालिका दप्तरी याबाबतची नोंद घेतली जाईल-

| अ. क्र. | विभाग | मालमत्ता क्र. | रिसीट नं. | ज्याचे नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्या किंवा करदात्याचे नाव | खरीददाराचे किंवा अभिहस्तांकन करदात्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १. | निळेमोरे-७ | NL३०/३६८/९ | १७७५७ | जयेशकुमार सत्यनारायण दवे | परविन कपुरचंद कुमावत |
| २. | निळेमोरे-७ | NL३०/३७६/२५ | १७७९३ | राजेश के नवाळे | पप्पुकुमार यादव / बबिता देवी |
| ३. | निळेमोरे-७ | NL३०/३७०/४२४ | १७८४४ | डी. जी. डेव्ह. | धर्मेंद्र कुमार यादव |
| ४. | निळेमोरे-७ | NL३०/२८४/१६ | १७७३७ | ज्ञानेश्वर शिवा पालयेकर | चंद्रकांत एस पाष्टे/श्रध्दा चंद्रकांत पाष्टे |
| ५. | निळेमोरे-७ | NL३०/३६९/३७ | १७७२३ | ओमप्रकाश उपाध्याय | भारत भुषन सिंह |
| ६. | निळेमोरे-६ | NL२९/१९६/६ | १७८८४ | सनत मेहता | प्रविन कुमार सिंह/रुची प्रविन सिंह |
| ७. | निळेमोरे-६ | NL२९/२१८/१४ | १७८८५ | रविंद्र जाधव/मंजीता रविंद्र जाधव | अब्दुल वहीद अब्दुल हई खान व नाजमा खातुन |
| ८. | निळेमोरे-६ | NL२९/१९२/३९ | १७७५५ | मधु मनी आचार्य | प्रदिप सेतबान पांडये |
| ९. | निळेमोरे-६ | NL२९/२३६/१४२ | १७८१७ | मंगलमुर्ती इस्टेट्स डेव्ह. | अर्चना अर्जुन पिगुळकर |
| १०. | निळेमोरे-६ | NL२९/२३६/१८४ | १७७८५ | मंगलमुर्ती इस्टेट्स डेव्ह. | वरुन गोपाळ येवले |
| ११. | निळेमोरे-६ | NL२९/१२७/४० | १८९५० | तानाजी निव्हती खोडकर | मिनाक्षी समिती पाटील/ समित संभाजी पाटील |
| १२. | निळेमोरे-६ | NL२९/२३६/१५१ | १८८३८ | मंगलमुर्ती इस्टेट्स डेव्ह. | मोहम्मद अल्ताफ नाजीर हुसेन खान / आम्रा खान |
| १३. | निळेमोरे-६ | NL२९/१८८/१२८ | १८८४९ | फिलोक्स अंन्थोनी | निलेश सुदम कोकरे/निशीगंधा निलेश कोकरे |
| १४. | निळेमोरे-६ | NL२९/१९५/९९ | १८८४२ | दिपीका दिपक तिवारी | लालधर राजेंद्रप्रसाद तिवारी |
| १५. | निळेमोरे-६ | NL२९/१६०/२८ | १८८२९ | वैभव बी जाधव | ज्योती भरत घायफुले |
| १६. | निळेमोरे-६ | NL२९/२१२/१२२ | १७९३७ | श्रीनाथा मोतीलाल गुप्ता | मनोज मोतीलाल गुप्ता व सुनीता मनोज गुप्ता |
| १७. | निळेमोरे-६ | NL२९/१४०/१५ | १८१०१ | अझीन ए गणी व कमरुनीशा अझीन शेख | अचलाराम बी चौधरी/शांती अचलराम चौधरी |
| १८. | निळेमोरे-६ | NL२९/५२/१३ | १८८५७ | हरिहर प्रसाद दोंडे नाई | नेसार अहमद |
| १९. | निळेमोरे-६ | NL२९/२०२/२४८ | १८९६४ | मे. साई रिदम रियलटर्स | अल्पना लवकेश कुमार तिवारी |
| २०. | निळेमोरे-६ | NL२९/२३६/२०७ | १८९९६ | सुजित नारायण कांबळे | सैफ अली खालील मुर्तजा खान/हिना सैफ खान |

XXX
(निता कोरे)
सहायक आयुक्त
प्रभाग समिती (ई) नालासोपारा

Printed, published and owned by **Rakesh Shankar Gore** and printed at Somani Printing Press Unit No. 4, Ground Floor, N.K. Industrial Estate, Off. Aarey Road, Near Parvasi Ind Estate, Gate No.2, Goregaon(E), Mumbai- 400063 Maharashtra and published at 105-A-Wing, 1st Floor, Maa-Ashapura Chs Ltd. Near Gurunanak Hospital, BKC Link Road, Bandra (East), Mumbai-400051 Maharashtra. **Editor- Rakesh Shankar Gore.**
• Mail id : maharashtracrimetimes@gmail.com, Contact No- 9892386748 / 9803386748, Website : www.maharashtracrimetimes.com

# टाटा मुंबई मॅरेथॉन २०१६ मध्ये, बाल लैंगिक शोषणाविरोधात आवाज उठवणाऱ्या, अर्पणचे #PocsoPakadLega अभियान ठरले विशेष लक्षवेधी

**मुंबई (प्रथमेश चव्हाण) :** अर्पण ही एक जागतिक स्तरावर नावाजलेली स्वयंसेवी संस्था असून, ही संस्था बाल लैंगिक शोषणाची समस्या समूळ नष्ट करण्यासाठी कार्यरत आहे. 'बाल सुरक्षा सप्ताह' या आपल्या सामाजिक उपक्रमानिमित्त, अर्पण संस्थेने #PocsoPakadLega हा हॅशटॅग वापरून, एका प्रभावशाली आणि राष्ट्रव्यापी मोहिमेचे आयोजन केले होते. या बाल सुरक्षा सप्ताहातील ऊर्जा, उत्साह आणि सातत्य टिकवून ठेवण्यासाठी, आता अर्पण संस्थेने आणखी एक पाऊल उचलले असून, यासाठी अर्पणच्या सर्व कर्मचाऱ्यांनी टाटा मुंबई मॅरेथॉन २०१६ मध्ये सहभाग घेतला. बाल लैंगिक शोषणाच्या समस्येविषयी व्यापक जनजागृती करण्यासाठी आणि मुंबई मॅरेथॉनमध्ये सहभागी झालेल्या हजारो धावपटूंना, त्यांना पाठिंबा देण्यासाठी जमलेल्या असंख्य समर्थकांना आणि नागरिकांना, या विषयावर खुला संवाद साधण्यास प्रोत्साहन देण्यासाठी, अर्पणने टाटा मुंबई मॅरेथॉनसारख्या, भारतातील सर्वश्रुत आणि प्रतिष्ठित सार्वजनिक व्यासपीठाचा सर्वोत्तम वापर केला. तसेच या उपक्रमाच्या माध्यमातून, अर्पणने बाल लैंगिक शोषणाच्या घटनांमध्ये, मुलांना न्याय मिळवून देणाऱ्या, पॉक्सो कायद्याच्या ('लैंगिक अपराधांपासून बाल संरक्षण अधिनियम') प्रभावी अंमलबजावणीसाठी, सामान्य नागरिकांच्या सामाजिक जबाबादारीकडे सर्वांचे लक्ष वेधले. अर्पणतर्फे दरवर्षी आयोजित केल्या जाणाऱ्या बाल सुरक्षा सप्ताह या सार्वजनिक जनजागृतीपर मोहिमेचा यंदाचा मध्यवर्ती विषय होता - "PocsoPakadLega". अर्पण संस्थेच्या सदिच्छा दूत (गुडविल अम्बॅसेडर) आणि हिंदी चित्रपटसृष्टीतील ख्यातनाम अभिनेत्री विद्या बालन यांनी, १४ नोव्हेंबर ते २० नोव्हेंबरमध्ये राबवलेल्या या सामाजिक उपक्रमाचे नेतृत्व केले आणि या उपक्रमाला देशभरातून अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. या अभियानाअंतर्गत आयोजित केलेल्या विविध उपक्रमांमध्ये, देशभरातून जवळपास १६ करोड ५० लाखांपेक्षा अधिक नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदवला. यंदाच्या बाल सुरक्षा सप्ताहाच्या माध्यमातून, अर्पणने बाल लैंगिक शोषणासारखे गंभीर गुन्हे करणाऱ्या व्यक्तींवर थेट निशाणा साधला आणि जर त्यांनी कोणत्याही मुलाला अयोग्यपणे स्पर्श केला, तर पॉक्सो कायदा त्यांना पकडेल, अशा स्पष्ट शब्दांत, त्यांना मुलांपासून लांब राहण्याचा इशारा दिला. तसेच पॉक्सो कायद्याचे (लैंगिक अपराधांपासून बाल संरक्षण अभियान) अस्तित्व अधोरेखित करून, या कायद्याच्या उल्लंघनाचे परिणाम किती भयावह असू शकतात, याची त्यांना जाणीव करून दिली. त्यामुळे हा केवळ एक इशारा नसून, बाल लैंगिक शोषण रोखण्याच्या दिशेने उचललेलं प्रभावी पाऊल ठरेल, यात शंका नाही. टाटा मुंबई मॅरेथॉन २०१६ च्या ड्रीम रन स्पर्धेमध्ये अर्पणच्या संपूर्ण टीम सहभागी झाली होती.




अर्पणच्या सर्व कर्मचाऱ्यांनी एकमेकांच्या सूरात सूर मिसळत, अत्यंत अनोख्या पद्धतीने बाल सुरक्षेचा संदेश दिला आणि या स्पर्धेत आपले अस्तित्व ठळकपणे दाखवून, बाल सुरक्षा संदेशांना पुन्हा उजाळा दिला. याप्रसंगी मुलांना सुरक्षित ठेवण्याप्रती, आपली सामूहिक जबाबदारी आणि संघटित कृतीची गरज अधोरेखित करणारे फलक आणि घोषवाक्यांचा प्रभावीपणे वापर करण्यात आला. या घोषवाक्यांच्या माध्यमातून अर्पणने सर्व स्पर्धकांना आणि नागरिकांना या समस्येविरुद्ध एकत्रितपणे कृती करण्याचे आवाहन केले. कारण जेव्हा समाजातील जबाबदार आणि प्रौढ व्यक्ती या समस्येविरुद्ध आवाज उठवतील, तेव्हाच पॉक्सोसारख्या कायद्यांची प्रभावीपणे अंमलबजावणी करता येईल आणि बाल लैंगिक शोषणासारखे गंभीर गुन्हे केलेल्या व्यक्तींना, त्यांच्या कृत्यांबद्दल दोषी ठरवता येईल, अशी अर्पणची भूमिका आहे. यासोबतच टाटा मुंबई मॅरेथॉनच्या सर्व स्पर्धकांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि त्यांच्यापर्यंत #PocsoPakadLega या अभियानातील मुख्य संदेश पोहोचवण्यासाठी, अर्पणने यावर्षीसुद्धा 'मोटिव्हेशनल झोन स्टेजची' उभारणी केली. या स्टेजवर बसवलेली आणि मोटारीच्या साहाय्याने फिरणारी हातकडी सर्व स्पर्धकांचे लक्ष वेधून घेत होती. मुलांना असुरक्षित करणाऱ्या व्यक्ती पॉक्सो कायद्याच्या कचाट्यापासून सुटू शकत नाहीत, उलट हा कायदा त्यांना आपल्या कृत्यांबद्दल दोषी ठरवून कठोर शिक्षा सुनावेल, हा संदेश जनमानसात रुजवण्यास या उपक्रमाने मदत केली. या अत्यंत लक्षवेधी आणि कायद्याला गंभीरपणे घेण्यास भाग पाडणाऱ्या स्वयंचलित हातकडीमुळे, हजारो धावपटू, समर्थक आणि मॅरेथॉनची मजा लुटण्यासाठी आलेल्या असंख्य सर्वसामान्य मुंबईकरांनी अर्पणच्या मोटिव्हेशनल झोन स्टेजपाशी थांबून, हा संदेश वाचला आणि बाल लैंगिक शोषणाच्या लढ्यात सामील होण्याचा निर्धार केला. याशिवाय टाटा मुंबई मॅरेथॉनदरम्यान अर्पणने बाल लैंगिक शोषणाविरुद्ध जनमत तयार करण्यासाठी, एक भव्य स्वाक्षरी मोहीम राबवली आणि तिथे लाखोंच्या संख्येने जमलेल्या सामान्य नागरिकांना आमंत्रित करून, त्यांना बाल सुरक्षेची प्रतिज्ञा घेण्यासाठी आणि बाल लैंगिक शोषणाच्या घटना रोखण्यासाठी प्रोत्साहन देण्यात आले. तसेच या उपक्रमाने मॅरेथॉनमध्ये सहभागी झालेल्या स्पर्धकांना स्टेजवर जाऊन विद्या बालन यांच्या कटआऊटसोबत फोटो काढण्याची आणि हे फोटो त्यांच्या वैयक्तिक समाजमाध्यमांवर पोस्ट करून, बाल सुरक्षेचा संदेश सर्वदूर पसरवण्याची संधी दिली. टाटा मुंबई मॅरेथॉनचे एकंदर वातावरण अत्यंत चैतन्याने भरून गेले होते. मुंबईकरांची एरव्ही कधीही न थकणारी आणि थांबणारी पावलं आज मात्र आपसूकच PocsoPakadLega च्या दिशेने वळत होती. अनेक स्पर्धकांनी आणि सर्वसामान्य नागरिकांनी अर्पणच्या अभियानाला भरभरून प्रतिसाद दिला, त्यांनी आमच्या कार्याला शुभेच्छा दिल्या, आमच्यासोबत बाल सुरक्षेच्या घोषणा दिल्या, गाणी गायली आणि मुलांना सुरक्षित ठेवण्याची प्रतिज्ञादेखील घेतली. अर्पणच्या कार्याला समर्थन देणाऱ्यांमध्ये १८ वर्षांच्या तरुणांपासून ते अगदी ८० वर्षांच्या ज्येष्ठ नागरिकांचादेखील समावेश होता. गेल्या वर्षी म्हणजेच टाटा मुंबई मॅरेथॉन "२०२५ मध्ये अर्पणला सर्वोत्तम मोटिव्हेशनल झोन स्टेजसाठी दुसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक मिळाले होते. यावर्षीचे मोटिव्हेशनल झोन स्टेज उभारताना, अर्पणने बाल लैंगिक शोषणाच्या समस्येकडे सर्वांचे लक्ष वेधणे आणि प्रतिबंध, अशा दोन मुख्य घटकांना प्राधान्य दिले. अर्पणच्या संस्थापिका आणि मुख्य कार्यकारी अधिकारी पूजा तापडिया याप्रसंगी बोलताना म्हणाल्या - "बाल लैंगिक शोषणाच्या समस्येविषयी आपल्या देशवासियांनी फार पूर्वीपासून मौन धारण केले आहे. देशातील नागरिकांना या विषयावर बोलण्यास प्रवृत्त करण्यासाठी आणि शोषणकर्त्यांना त्यांच्या कृत्यांबद्दल दोषी ठरवण्यासाठी आम्ही POCSOPakadLega हे अभियान सुरू केले. बाल लैंगिक शोषणाविषयीची कुजबूज थांबवून, या विषयावर मोकळेपणाने चर्चा करण्यासाठी आणि अशा प्रकारचे गंभीर गुन्हे करणाऱ्या व्यक्तींवर कायद्याची वचक बसवण्यासाठी, हे अभियान उपयोगी ठरेल यात शंका नाही.

## चार किडनी उपलब्धतेचा मेसेज तुम्हाला आला का?

**मुंबई (विशाल कारंडे) :** गेल्या काही महिन्यांपासून सोशल मीडियावर सुधीर आणि त्याच्या पत्नी यांना ब्रेनडेड घोषित केले असून, चार किडनी उपलब्ध आहेत. या आशयाचा मेसेज प्रसारित केला जात आहे. अनेकांच्या मोबाइलवर तो मेसेज आलेलासुद्धा असेल, काही जण त्याची दाखल घेतात तर वाचून सोडून देतात. विशेष म्हणजे, त्यामध्ये सुधीर यांच्या कुटुंबीयांना त्या किडनी दान करावयाच्या आहेत. कृपया प्रसारित करा, असे सांगितलेले असते. मात्र, किडनी विकारतज्ज्ञांनी अशा पद्धतीने कोणतीही किडनी उपलब्ध नसते.




त्यामुळे या फेक मेसेजपासून सावध राहण्याचे आवाहन केले आहे.गेल्या काही महिन्यांपासून हा मेसेज सर्व ठिकणी व्हायरल झाला आहे. अनेक जण सोशल मीडियावरील हा संदेश कुणाच्या तरी फायद्याचा ठरावा म्हणून अनेक ओळखीच्या लोकांना आणि ग्रुप्समध्ये पाठवत आहे. मात्र,त्याची सत्यता तपासण्याची तसदी कुणीही घेत नाही. तसेच त्या मेसेजमध्ये दोन मोबाइल क्रमांक सुद्धा देण्यात आले आहेत. मात्र, ते दोनही क्रमांक बंद आहेत. बॉम्बे हॉस्पिटलचे किडनीविकार तज्ज्ञ डॉ. श्रीरंग बिच्चू यांनी सांगितले की, अनेक महिन्यांपूर्वी हा मेसेज सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. वैद्यकीयदृष्ट्या अशा पद्धतीने किडनी उपलब्ध नसतात. नागरिकांनी या मेसेजवर विश्वास ठेवू नये. याशिवाय तुम्हाला हा मेसेज आल्यास कोणालाही फॉरवर्ड करू नका. गेल्या काही वर्षांत मलाही अशा स्वरूपाचा मेसेज अनेकदा आला आहे.

## प्रजासत्ताक दिनी मेट्रो २ बी आणि मेट्रो ९ सेवेत येणार

**मुंबई (गणेश बागडे) :** मुंबई महापालिका निवडणुका पार पडल्यानंतर रखडलेले मेट्रो प्रकल्प पुन्हा मार्गी लागले असून, मंडाळे ते डायमंड गार्डन मेट्रो २ बी आणि दहिसर पूर्व ते काशीगाव असा मेट्रो ९ चा पहिला टप्पा अशा या महत्त्वाच्या मार्गिका लवकरच प्रवाशांच्या सेवेत सुरू होणार आहेत. प्रजासत्ताक दिनानिमित्त म्हणजेच २६जानेवारीला मुंबईकरांना ही खास भेट मिळू शकते.गेल्या काही महिन्यांपासून महापालिका निवडणुका पूर्ण झाल्यानंतर मेट्रो २बी आणि मेट्रो ९ सुरू केल्या जातील, असे मुंबई महानगर विकास प्राधिकरणाकडून (एमएमआरडीए) सांगण्यात येत होते. मंडाळे ते डायमंड गार्डन



जोडणारी मेट्रो२ बी आणि दहिसर ते काशिगाव जोडणारी मेट्रो ९ या मार्गिकांचे उद्घाटन डिसेंबरमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार होते. मात्र, निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे हा कार्यक्रम पुढे ढकलण्यात आला. आता महापालिकेच्या निवडणुका पार पडल्याने मेट्रो प्रकल्पांच्या उद्घाटनाचा मार्ग मोकळा झाला आहे. दहिसर ते सुभाष चंद्र बोस स्टेडियम जोडणाऱ्या टप्प्याचे काम पूर्ण झाले असून, हा टप्पा २६ जानेवारी रोजी प्रवाशांसाठी सुरू होण्याची दाट शक्यता अधिकाऱ्यांनी व्यक्त केली आहे. डिसेंबर महिन्यात या मेट्रो मार्गिकेची यशस्वी चाचणी घेण्यात आली होती. चाचणीदरम्यान आढळलेल्या काही त्रुटींवर एमएमआरडीएला सूचना देण्यात आल्या होत्या. त्या त्रुटी दूर करण्यात आल्याचे सांगण्यात येत असून, आता केवळ सीएमआरएस कडून सुरक्षा प्रमाणपत्र मिळणे बाकी आहे. येत्या आठवड्यात हे प्रमाणपत्र मिळण्याची शक्यता असून, त्यानंतर ४.४ किमी लांबीचा टप्पा सुरू केला जाईल. मेट्रो लाईन ९ ची एकूण लांबी १३.५ किमी आहे. सध्या या मार्गिकेचा पहिला टप्पा प्रवाशांसाठी खुला करण्यात येणार आहे. या टप्प्यात दहिसर पूर्व, पांडुरंगवाडी, मिरागाव आणि काशीगाव अशी चार स्थानके असतील. मेट्रो ९ आणि मेट्रो ७ ए पूर्ण क्षमतेने सुरू झाल्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या टर्मिनल २ पासून थेट मिरा-भाईंदरपर्यंत अखंड मेट्रो कनेक्टिव्हिटी उपलब्ध होणार आहे. यामुळे पश्चिम उपनगरातील प्रवाशांचा प्रवास अधिक वेगवान, सोयीस्कर आणि वेळेची बचत करणारा ठरणार आहे.

## आर्टिफिशियल इंटेलिजेंस वापरा, पण जबाबदारी विसरू नका! एआय-निर्मित युक्तिवादावर हायकोर्ट संतप्त

**मुंबई (नितीन देवळेकर) :** आर्टिफिशियल इंटेलिजेंस म्हणजेच एआयचा वापर सध्याच्या काळात मोठ्या प्रमाणात वाढला आहे. आपण शाळा, कॉलेज, ऑफीसमध्ये सर्वत्र एआयचा वापर करतो. इतकंच नाही तर काही लोकं घरातील काम करण्यासाठी आणि जेवण बनवण्यासाठी देखील एआयची मदत घेतात. स्मार्टफोन, टिव्ही आणि इतर महत्त्वाच्या गॅझेट्सप्रमाणेच आता एआय देखील आपल्या जिवनाचा एक महत्त्वपूर्ण भाग बनला आहे. केवळ घरी आणि ऑफीसमध्येच नाही तर आता न्यायालयात देखील एआयचा वापर केला जात आहे. यासंबंधित एक आदेश न्यायालयाने जारी केला आहे. मुंबई उच्च न्यायालयाने एआय वापरून तयार केलेले कायदेशीर युक्तिवाद सादर केल्याबद्दल पक्षावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. एका प्रकरणात प्रत्यक्षात अस्तित्वात नसलेला निकाल उद्धृत करण्यात




आला आणि यामुळेच न्यायालयाने संबंधित पक्षावर ५० हजार रुपयांचा दंड ठोठावला. न्यायालयाने स्पष्ट केलं की अशा मशीन-निर्मित आणि न पडताळलेल्या मजकुरामुळे न्यायप्रक्रियेत अडथळे येतात. जर कोणत्याही वकिलाकडून भविष्यात असा प्रकार झाल्यास कठोर कारवाई, दंड आणि वकिलांना बार कौन्सिलकडे पाठवण्याचा इशाराही न्यायालयाने दिला आहे. योग्य पडताळणीशिवाय आर्टिफिशियल इंटेलिजेंस (एआय) द्वारे निर्माण केलेले कायदेशीर युक्तिवाद सादर करण्याच्या प्रवृत्तीवर मुंबई उच्च न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त केली

### न्यायालयाकडून इशारा

न्यायालयावर अनावश्यक किंवा अस्तित्वात नसलेली सामग्री लादण्याची ही प्रवृती निषेधार्ह आहे आणि सुरुवातीलाच ती थांबवली पाहिजे असे उच्च न्यायालयाने म्हटले आहे. भविष्यातील प्रकरणांमध्ये दंड आकारला जाईल आणि जर कोणत्याही वकिलाने असे केले तर प्रकरण बार कौन्सिलकडे पाठवले जाऊ शकते असा इशाराही खंडपीठाने दिला.

आहे. अलीकडेच, न्यायालयाने अशाच एका प्रकरणात एका प्रतिवादीला प्रत्यक्षात अस्तित्वात नसलेला निकाल उद्धृत केल्याबद्दल ५०,००० रुपयांचा दंड ठोठावला. या प्रकरणावर भाष्य करताना, न्यायमूर्ती एम.एम. साठाये म्हणाले की पडताळणीशिवाय मशीन-निर्मित साहित्य न्यायालयात सादर केल्याने न्यायाच्या जलद प्रक्रियेत अडथळा येतो. हार्ट अँड सोल एंटरटेनमेंट कंपनीचे संचालक मोहम्मद यासीन यांनी दाखल केलेल्या लेखी युक्तिवादांमध्ये एआय टूल्सचे स्पष्ट संकेत असल्याचे उच्च न्यायालयाला आढळून आले. यामध्ये वारंवार भाषा, विशिष्ट टिक-मार्क आणि मशीन-शैलीतील लेखन यांचा समावेश होता. या याचिकेतील सर्वांत गंभीर मुद्दा असा होता की युक्तिवादात 'ज्योती दिनेश तुलसीयानी विरुद्ध एलिगंट असोसिएट्स' या शीर्षकाच्या निर्णयाचा उल्लेख केला गेला होता, परंतु न्यायालय किंवा त्यांच्या कायदेतज्ज्ञांना या निर्णयाचा संदर्भ सापडला नाही.

## सीईटी नोंदणीतील आधार-अपार आयडी नियम विद्यार्थ्यांसाठी डोकेदुखी

**मुंबई (सम्यक कासारे) :** व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या सीईटी परीक्षेच्या नोंदणी प्रक्रियेत यंदा राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने लागू केलेले आधार कार्ड आणि अपार आयडीचे नियम आता विद्यार्थ्यांसाठी डोकेदुखी ठरत आहेत.




आधार, अपार आयडी आणि दहावीबारावीच्या गुणपत्रिकेतील नावांमध्ये असलेल्या किरकोळ तफावतीमुळे अनेक विद्यार्थ्यांना अर्ज भरताना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे अशा तक्रारी विद्यार्थ्यांनी केल्या आहेत. यंदापासून सर्व अभ्यासक्रमांच्या सीईटी नोंदणीसाठी आधार व अपार आयडीची शंभर टक्के पडताळणी बंधनकारक करण्यात आली आहे. मात्र या पडताळणीदरम्यान नाव अक्षरशः जुळले तरच अर्ज पुढे जातो. नावाच्या स्पेलिंगमधील फरक, मधले नाव, आडनावातील बदल किंवा जुन्या शासकीय नोंदींतील विसंगती आढळल्यास विद्यार्थ्यांचा अर्ज नाकारला जात आहे. ही नावातील तफावत बहुतांश वेळा विद्यार्थ्यांच्या चुकीमुळे नसते. शालेय दाखले, जन्मनोंदणी, जुन्या प्रशासकीय प्रक्रियांतील त्रुटी यामुळे अनेक विद्यार्थ्यांची नावे वेगवेगळ्या दस्तऐवजांत वेगळी नोंदली गेलेली आहेत. यामुळे सर्वाधिक फटका ग्रामीण भागातील, आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि पहिल्या पिढीतील शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना बसत असल्याचे स्पष्ट दिसत आहे. जेईई मुख्यसारख्या राष्ट्रीय स्तरावरील परीक्षांमध्ये नावातील अशा विसंगती असतानाही विद्यार्थ्यांना परीक्षा देण्याची मुभा दिली जाते आणि अंतिम टप्प्यावर कागदपत्रांची पडताळणी होते, तर सीईटी कक्ष अशाप्रकारे मुभा द्यावी, अशी मागणी काही विद्यार्थ्यांनी केली आहे. सीईटी कक्षाने या प्रकरणी अद्याप ठोस आणि दिलासादायक भूमिका स्पष्ट केलेली नाही. विद्यार्थ्यांना गुणवत्तेच्या आधारे परीक्षेची संधी मिळावी की केवळ कागदोपत्री काही त्रुटीत अडकवून बाहेर काढले जावे, हा निर्णय सीईटी कक्षाला घ्यावा लागणार आहे.

## जैन संघाच्या दोन वर्षांत १०८ दीक्षा पूर्ण: अध्यात्मिक इतिहासातील ऐतिहासिक कामगिरी

**मुंबई (राकेश गायकवाड) :** जैन अध्यात्मिक इतिहासात एक ऐतिहासिक आणि अभूतपूर्व कामगिरी करत श्री. अखिल भारतवर्षीय साधुमार्गी जैन संघाने अवघ्या दोन वर्षांच्या कालावधीत १०८ दीक्षा पूर्ण करण्याचा एक महान आध्यात्मिक संकल्प यशस्वीरित्या पूर्ण केला आहे. ऑक्टोबर २०२३ मध्ये आचार्य श्री १००८ रामलाल जी महाराज साहेब यांनी हे ऐतिहासिक आवाहन केले होते. त्यांनी जैन समाज आणि संन्यासी वर्गाला दोन वर्षांत १०० हून अधिक दीक्षा पूर्ण करण्यासाठी एकत्रितपणे कार्य करा, असे त्यांनी आवाहनात म्हटले होते. या सखोल आध्यात्मिक दृष्टीकोनाला प्रतिसाद देत, साधुमार्गी जैन परंपरेतील पूज्य संत आणि साध्वींनी स्वतःला या मोहिमेसाठी पूर्णपणे समर्पित केले. डिसेंबर २०२५ पर्यंत हा संकल्प केवळ पूर्णच झाला नाही, तर १०८ दीक्षांच्या पूर्ततेसह तो उद्दिष्टाच्या पलीकडे गेला, जो जैन धार्मिक इतिहासातील एक महत्त्वाचा क्षण ठरला आहे. स्थानकवासी जैन परंपरेच्या इतिहासात ही पहिलीच वेळ आहे की, इतक्या मोठ्या संख्येने दीक्षांची घोषणा आधीच






करण्यात आली होती आणि एका निश्चित व अल्प कालावधीत त्या यशस्वीरित्या पूर्ण झाल्या. श्री अखिल भारतवर्षीय साधुमार्गी जैन संघ राष्ट्रीय अध्यक्ष: श्री नरेंद्र जी गांधी, जावद श्री अखिल भारतवर्षीय साधुमार्गी जैन समता युवा संघ (अंतर्गत: श्री अ.भा. साधुमार्गी जैन संघ) सुमित जी बुंब यांनी म्हटले, की 'ही उपलब्धी केवळ एक संख्यात्मक टप्पा नसून, ती एक आध्यात्मिक जागृती आहे. हे त्याग आणि आत्म-साक्षात्काराच्या मार्गावर चालण्यासाठी आमचे संत, साध्वी आणि जैन समाजाची गाढ श्रद्धा, शिस्त आणि सामूहिक वचनबद्धता दर्शवते. ही घटना भावी पिढ्यांना संकल्प आणि शुद्धतेने धर्माच्या मार्गावर चालण्यासाठी प्रेरित करो." ही कामगिरी साधुमार्गी जैन संघाची सामूहिक आध्यात्मिक शिस्त, भक्ती आणि संघटनात्मक शक्तीचा एक प्रबळ पुरावा आहे. हे आधुनिक जगात संयम, आत्म-शिस्त आणि आंतरिक जागृती या जैन मूल्यांप्रती असलेल्या नूतनीकरण केलेल्या वचनबद्धतेचे प्रतीक आहे. या ऐतिहासिक कामगिरीचा उत्सव साजरा करण्यासाठी, १८ जानेवारी २०२६ रोजी एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये या आध्यात्मिक संकल्पाच्या पूर्ततेचा आनंद साजरा केला जाईल आणि आचार्य श्री १००८ रामलाल जी महाराज साहेब यांचे मार्गदर्शन तसेच संत, साध्वी आणि संपूर्ण जैन समाजाच्या समर्पित प्रयत्नांचा गौरव केला जाईल. हा मैलाचा दगड जैन इतिहासातील एक महत्त्वपूर्ण अध्याय म्हणून ओळखला जात असून, यामुळे साधुमार्गी जैन परंपरेचा निरंतर आध्यात्मिक वारसा अधिक दृढ झाला आहे.

# उल्हास नदी पुन्हा जलपर्णीच्या विळख्यात

**डोंबिवली (गणेश बागडे) :** कल्याण तालुक्यातील ग्रामीण भागासह मुंबई, नवी मुंबई, ठाणे, उल्हासनगर, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, आदी शहरी भागातील रहिवाशांची तहान भागविणारी उल्हास नदी पुन्हा एकदा जानेवारी महिन्यातच जलपर्णीच्या विळख्यात सापडलेली दिसून येऊ लागली आहे. ही उपद्रवी जलपर्णी म्हणजे वाढत्या प्रदूषणाची लक्षणे मानली जात आहेत. त्यामुळे लोकांना आता दूषित पाण्याला व त्यापासून होणाऱ्या आजारांना सामोरे जावे लागणार असे दिसते. या उपद्रवी जलपर्णीला खालसा करण्याचे नवनिर्वाचित नगरसेवकांपुढे कडवे आव्हान आहे. ठाणे जिल्ह्यातील ५०/६० लाखांपेक्षा जास्त रहिवाशांना पाणी पुरवठा करणारी उल्हास नदी मागील काही वर्षांपासून मोठ्या प्रमाणावर प्रदूषित होऊ लागली आहे. आसपासच्या कारखान्यांतून सोडले जाणारे रसायनमिश्रीत सांडपाणी आणि नदीत वेगाने वाढत असलेली जलपर्णी या दोन्हीमुळे जलचरांचे अस्तित्व संकटात सापडले आहे. कल्याण तालुक्यात उल्हास, बारवी, काळू आणि भातसा या चार बारमाही वाहणाऱ्या नद्या आहेत. यातील उल्हास नदीच्या पाण्यावर कल्याण तालुक्यातील शेकडो ग्रामपंचायती व विविध महानगर पालिका अंवलबून आहेत, बदलापूर, कर्जत, अंबरनाथ, आणि पुढे कल्याण येथे फार्महाऊस, इमारतींमधील सांडपाणी, रसायन, जनावरांचे तबेले, शहरांतून निघणारे सांडपाणी, ड्रेनेज लाईन, यांचे प्रक्रिया न केलेले पाणी सरळ उल्हास नदीच्या पात्रात येत असल्याने जलपर्णी वाढत आहे. २२ मार्च २०२५ रोजी जागतिक जलदिनी मी कल्याणकर संस्थेचे अध्यक्ष नितीन निकम, माजी नगरसेवक उमेश बोरगावकर, कैलाश शिंदे, श्रीनिवास घाणेकर, सुदाम गंगावणे या मंडळींनी नदी पात्रात बसून आंदोलन सुरू केले होते. ८ दिवसांनी राज्य शासनाद्वारे बैठक घेऊन १५ दिवसांत मशीन लावून जलपर्णी काढण्यात येईल, असे आश्वासन राज्य सरकारने दिल्याने आंदोलन समाप्त करण्यात आले होते. अखेर स्वयंचलित मशीन लावून उल्हास नदीतील मोहना येथे जलपर्णी काढण्याचे काम सुरू करण्यात आले. हे काम महाराष्ट्र प्रदुषण मंडळतर्फे करण्यात आले होते. मात्र आता पुन्हा बदलापूर, रायते, कांब्याजवळ जलपर्णी जमा व्हायला सुरूवात झाली आहे. मार्च महिन्यात ती सर्वत्र पसरली जाईल, असे परिस्थितीवरून दिसून येते.



# विक्रमगड तालुक्यात कडधान्य पिकांना आला बहर



**पालघर (रघुनाथ कदम) :** गेल्या दहा ते बारा दिवसांपासून विक्रमगड तालुक्यात थंडीचे प्रमाण लक्षणीय वाढले असून, याचा सकारात्मक परिणाम रब्बी हंगामातील कडधान्य पिकांवर दिसून येत आहे. अधूनमधून पडणारे धुके, कोरडे हवामान व रात्रीची कडाक्याची थंडी यामुळे वाल, हरभरा, पावटे, मूग, चवळी व उडीद या कडधान्य पिकांसाठी पोषक वातावरण निर्माण झाले आहे. परिणामी अनेक भागात ही पिके चांगली बहरली असून, तालुक्यातील शेतकरी वर्गातून समाधान व्यक्त केले जात आहे. विक्रमगड तालुक्यात भात हे मुख्य खरीप पीक असले तरी दिवाळीनंतर अनेक शेतकरी रब्बी हंगामात कडधान्य पिकांची लागवड करतात. चालू हंगामातही भात काढणीनंतर शेतकऱ्यांनी उपलब्ध ओलाव्यावर कडधान्य पिकांची लागवड केली होती. मात्र गेल्या काही वर्षांपासून वातावरणातील बदल, अवकाळी पाऊस, ढगाळ व दमट हवामान यामुळे कडधान्य पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत होते. त्यामुळे यंदाही डिसेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात अचानक निर्माण झालेल्या ढगाळ वातावरणामुळे पिकांवर विपरीत परिणाम होईल की काय, अशी भीती शेतकरी वर्गात होती. दरम्यान, जानेवारी महिन्यात वातावरणात झालेल्या बदलामुळे चित्र पालटले. आकाश स्वच्छ राहणे, सकाळी हलके धुके आणि रात्री कडाक्याची थंडी यामुळे कडधान्य पिकांची वाढ जोमाने होऊ लागली. विशेषतः हरभरा व वाल या पिकांना फुलोरा व शेंगा धरू लागल्याने उत्पादनाबाबत शेतकऱ्यांमध्ये आशा निर्माण झाली आहे. काही भागांत मूग, चवळी व उडीद पिकेही चांगल्या अवस्थेत असल्याचे चित्र आहे. तालुक्यातील अनेक शेतकरी सांगतात की, जर पुढील काही दिवस असेच कोरडे व थंड वातावरण राहिले, तर कडधान्य पिकांचे उत्पादन समाधानकारक मिळण्याची शक्यता आहे. त्यामुळे यंदाचा रब्बी हंगाम शेतकऱ्यांसाठी दिलासादायक ठरण्याची चिन्हे दिसत आहेत.

# भिवंडीत उभारणार अत्याधुनिक कृषी केंद्र



**ठाणे (तृप्ती गोरे) :** ठाणे जिल्ह्यातील शेतकऱ्यांना थेट बाजारपेठ आणि निर्यात संधी उपलब्ध करून देण्यासाठी भिवंडी तालुक्यातील बापगाव परिसरात एक अत्याधुनिक कृषी केंद्र उभारण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. या प्रकल्पाअंतर्गत मल्टी मॉडेल हब आणि टर्मिनल मार्केट विकसित करण्यात येणार असून यासाठी सुमारे ७ हेक्टर क्षेत्र राज्य कृषी पणन महामंडळाच्या ताब्यात देण्यात येणार आहे. हा प्रकल्प जागतिक बँकेच्या सहकार्याने आणि राज्य शासनाच्या माध्यमातून राबवण्यात येणार असून कृषी क्षेत्रातील पायाभूत सुविधा मजबूत करणे हा यामागचा मुख्य उद्देश आहे. ज्या ठिकाणी सरकारकडून मल्टी मॉडेल हब आणि टर्मिनल मार्केटची उभारणी करण्यात येणार आहे, त्या जागेवर जागतिक बँक आणि महाराष्ट्र सरकार यांचा संयुक्त उपक्रम असलेल्या बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय आणि ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) या प्रकल्पाच्या माध्यमातून हब आणि टर्मिनल मार्केटची उभारले जाणार आहे. मार्केटची जमीन राज्य कृषी पणन महामंडळाला मोफत दिली जाणार असून मार्केटमध्ये शेतमालासाठी अत्याधुनिक सुविधा उभारल्या जाणार आहेत. या केंद्राच्या उभारणीसाठी राज्य सरकारकडून जवळपास ९८ कोटी रुपयांचा आर्थिक पाठिंबा देण्यात येणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली. या कृषी केंद्रातून दरवर्षी मोठ्या प्रमाणावर शेतमालाची हाताळणी होणार असून फळे, भाजीपाला तसेच इतर कृषी उत्पादनांसाठी प्रक्रिया, फळे- व्हेपर हीट ट्रीटमेंट, विकिरण प्रकल्प, तसेच साठवणुकीच्या सुविधा आणि वाहतूक व्यवस्था, व्यापारी, निर्यातदार आणि शेतकरी यांना एकाच व्यासपीठावर आणून थेट व्यवहाराची संधी निर्माण केली जाणार आहे. या केंद्रात शेतमालाच्या गुणवत्तेवर भर देण्यात येणार असून प्रक्रिया आणि साठवणुकीसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार आहे. काढणीनंतर होणारे नुकसान कमी करणे, उत्पादनाचा दर्जा टिकवणे आणि जागतिक बाजारपेठेतील मागणीनुसार शेतमाल तयार करणे हे या प्रकल्पाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. या उपक्रमामुळे ठाणे जिल्ह्यासह राज्यातील अनेक भागांतील शेतकऱ्यांना फायदा होणार असून कृषी निर्यातीला गती मिळण्याची अपेक्षा आहे. यासोबतच या प्रकल्पातून स्थानिक पातळीवर रोजगाराच्या संधी निर्माण होऊन परिसरातील आर्थिक व्यवहारांनाही चालना मिळणार असल्याचे सरकारकडून सांगण्यात आले.

# रोजगार हमी योजनेची अंमलबजावणी कुचकामी; मोखाडा–खोडाळ्यात आठवडी बाजार ओस पडले

**पालघर (सचिन कदम) :** आठवडी बाजार म्हणजे दर आठवड्याच्या एका विशिष्ट दिवशी आणि विशिष्ट स्थानी भरणारा बाजार. मॉलच्या जमान्यातही ग्रामीण भागात आठवडे बाजार आपलं अस्तित्व टिकवून आहेत. प्रत्येक गावात आठवडे बाजार भरत असतो.मोखाडा तालुक्यात दस्तूरखुद्द मोखाडा येथे शुक्रवारी तर खोडाळा येथे शनिवारी आठवडी बाजार भरतो.परंतू स्थानिक मजूरांचे स्थलांतर आणि रोहयो यंत्रणेच्या चालढकलपणामूळे आठवडी बाजार आजघडीला पुर्णतः रोडावलेले आहेत. स्थानिक पातळीवर रोजगार मिळावा स्थलांतर थांबावे या उद्देशाने रोजगार हमी कायदा केंद्र व राज्य शासनाने पारित केला असला तरी स्थानिक प्रशासनाच्या उदासीनतेमुळे या कायद्याची अमलबजावणी होत नसल्याची बाब वेळोवेळी समोर आली आहे.यंत्रणांची चालढकल आणि नरेगाच्या कामांबाबत ५०% भागधारक असलेल्या ग्रामपंचायत प्रशासना सोबतच हमेशा मुबलक कामं देणाऱ्या तालुका कृषी विभागानेही कमालीचे औदासिन्य दाखवल्यामूळे बाजारपेठेत मंदीचे वातावरण दिसून येत आहे. १९७७-७८ मध्ये या योजनेचे कायद्यात रूपांतर केले आहे. या कायद्याच्या धर्तीवर २००५ मध्ये रोजगार हमी कायदा लागू करून या कायद्यातील तरदूतीचे आणि महाराष्ट्राच्या मूळ रोहयोतील तरदूतीचे एकत्रिकरण करून देशातील सर्वच राज्यामध्ये व महाराष्ट्र रोजगार हमी योजना (मग्रारोहयो) कार्यान्वित होती. परंतु शासनाच्या या महत्वाकांक्षी योजनेला बासनात गुंडाळून ठेवण्याचे काम केले जात असल्याने आदिवासींची रोजगारा अभावी होणारी फरपट थांबलेली नाही. या योजनेत मागेल त्याला कामही मिळत नाही आणि १५ दिवसात दामही मिळत नाही. त्यामुळे मजुर वीटभट्टी, इमारत बांधकाम, रेती काढणे यासारख्या मिळेल त्या कामाच्या शोधात कुटुंबासह फिरतो , संघर्ष करीत राहतो. नुकत्याच आलेल्या महसूल विभागाकडील साप्ताहिक अहवालानुसार तालुक्यात ३५८ कामे चालू असून त्यावर ९९६४ मजूरांना काम देण्यात आले आहे. तसेच सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात २३६८० मजुरांना कामे उपलब्ध करुन देण्यात आली असून त्यामधून ४३७९३७ एवढी मनुष्य दिन निर्मिती झालेली असुन तालुक्यात एकुण १४३७ यंत्रणेची कामे शेल्फवर असून ७३३८०७ मनुष्य दिन निर्मितीची कामे उपलब्ध असुन त्यानुसार मजुरांना कामे पुरविण्यात येणार असल्याचे महसूल विभागाने स्पष्ट केले आहे.



## ग्रामपंचायत प्रशासनाचा आखडता हात

तालुक्यातील एकूण नरेगाच्या कामांच्या पटीत ५०% कामे ही ग्रामपंचायत प्रशासनाने उपलब्ध करून द्यायची आहेत.परंतू ग्रामपंचायत प्रशासन त्याबाबत कमालीची हलगर्जी करत असल्याने स्थानिक ठिकाणीच रोजगार निर्मितीवर त्याचा दुष्परिणाम होत आहे.पर्यायाने वाड्या वस्त्या कुटूंब कबिल्यासह रोजगाराच्या शोधात विस्थापित झालेल्या आहेत.बंधाऱ्यातील गाळ उपसा,नाले सफाईची २३ कामे तसेच रस्त्यांची २ कामे अशी एकूण २५ कामे मिळून श ग्रामपंचायत स्तरावर एकूण १८३ कामे चालू आहेत व त्यावर ६४१८ इतकी मजूर उपस्थिती आहे यामध्ये घरकुल १५८ कामे असून त्यावर ४९३ मजूरांची उपस्थिती आहे.तर सार्वजनिक हिताची केवळ २५ कामे उपलब्ध करून देत ग्रामपंचायत प्रशासनाने हात आखडता घेतला आहे.

# मलंगगडावर देशातील सर्वात मोठी आणि लांब पल्ल्याची फ्युनिक्युलर ट्रेन भाविकांच्या सेवेत

**कल्याण (प्रथमेश चव्हाण) :** कल्याणमधील श्री मलंगगडावर आता भाविकांना मोठी सुविधा मिळणार आहे. देशातील सर्वात लांब फ्युनिक्युलर सेवा अखेर सुरू झाली आहे. रविवारी भाजपा आमदार किसन कथोरे आणि सुलभा गायकवाड यांच्या हस्ते या सेवेचं लोकार्पण करण्यात आलं. आजपासून सुरू झालेल्या या फ्युनिक्युलर सेवेमुळे भाविकांना मलंगगडावर जाणं अधिक सोपं, सुरक्षित आणि जलद होणार आहे. विशेष म्हणजे, सुप्रीम कंपनीकडून भाविकांसाठी दोन दिवस ही सेवा विनामूल्य उपलब्ध करून देण्यात आली आहे. श्री मलंगगड यात्रेच्या आधीच आता भाविकांच्या सेवेत फ्युनिक्युलर सेवा यंदा दाखल झाल्याने यंदाच्या यात्रेत



भाविकांना मोठी सोय होणार आहे. हा पथदर्शी प्रकल्पाचा प्रस्ताव २००४ मध्ये आमदार किसन कथोरे यांनी मांडला होता. तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या काळात या प्रस्तावाला मंजुरी मिळाली होती. मात्र मधल्या काळात याकडे दुर्लक्ष झालं होतं. त्यानंतर २०१२ मध्ये प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली. मात्र, विधानसभा क्षेत्राचे विभाजन झाल्यानंतर हा प्रकल्प रखडला होता. भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण सार्वजनिक बांधकाम मंत्री असताना त्यांनी या कामाला गती देण्यासाठी निधी उपलब्ध करून दिला. यानंतर कामाला पुन्हा सुरुवात झाली आणि अखेर यंदा २०२६ मध्ये या फ्युनिक्युलर प्रकल्पाचं काम पूर्ण झालं आहे. मलंगगडावर, हाजी मंगलला कल्याण, मुंबई, नवी मुंबईतून अनेक भाविक येतात. जाण्यासाठी अंदाजे २६०० पायऱ्या चढून वर गडावर जावं लागतं. हा गड चढण्यासाठी जवळपास २ तास लागतात. मात्र आता फ्युनिक्युलर ट्रेन आजपासून सुरू झाल्याने हे २ तासांचं अंतर अवघ्या १० मिनिटांत पूर्ण करून जाता येईल. या सुविधेच्या देखरेखीसाठी ७० जण असून १२० जण यातून प्रवास करू शकतात, अशी माहिती आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून या सेवेला मंजुरी मिळाल्यानंतर मुंबई मंत्रालयातून फ्युनिक्युलर सुरू करण्याची परवानगी देण्यात आली. श्री मलंगगड यात्रेच्या पार्श्वभूमीवर ही सेवा सुरू झाल्याने भाविकांना मोठा दिलासा मिळाला आहे. यापूर्वी मलंगगडावर जाण्यासाठी पायऱ्या चढून जावे लागत असे, ज्यामुळे अनेक भाविकांना त्रास होत असे. आता या फ्युनिक्युलर सेवेमुळे वृद्ध आणि लहान मुलांनाही सहजपणे गडावर जाता येणार आहे. या सेवेमुळे मलंगगडावरील पर्यटनालाही चालना मिळण्याची अपेक्षा आहे.

# खडवली नाक्यावरचा जुना पूल पाडणार, वाहतूक मार्गात बदल होणार

**कल्याण (आकाश कांबळे) :** कल्याण - पुणे लिंक रोडवरील खडवली नाका येथे असलेला जुना पूल पाडून नवा पूल बांधला जाणार आहे. हे काम २२ जानेवारीपासून सुरू होणार आहे. यासाठीच कल्याणमधील वाहतूक व्यवस्थेत बदल करण्याचा निर्णय झाला आहे. ठाणे शहर वाहतूक शाखेने कल्याण पूर्व भागासाठी वाहतूक नियंत्रण आणि वाहतुकीतील बदलाबाबत अधिसूचना जारी केली आहे. कल्याण पूर्व येथील खडवली नाका परिसरातला जुना पूल पाडून नवा पूल बांधला जाणार आहे. हे काम होईपर्यंत शहरातील वाहतूक मार्गात बदल करण्यात आले आहेत. हे बदल २२ जानेवारीपासून लागू होतील आणि पुलाचं काम पूर्ण होईपर्यंत कायम राहतील. नागरिकांनी सहकार्य करावे आणि वाहतूक कोंडी टाळण्यासाठी नव्या मार्गाने प्रवास करावा, असे आवाहन ठाणे शहर वाहतूक शाखेने केले आहे. खडवली नाका येथील पुणे लिंक रोडवरून विठ्ठलवाडी रेल्वे स्टेशन आणि श्रीराम चौकाकडे जाणाऱ्या सर्व वाहनांना आनंद दिघे चौक आणि स्मशानभूमी चौकात प्रवेश बंदी असेल. वाहनांना आनंद दिघे उड्डाणपूल आणि सम्राट चौक मार्गे वळवलं जाईल. तसंच श्रीराम चौक आणि विठ्ठलवाडी रेल्वे स्थानकाच्या पूर्वेकडून खडवली नाका आणि चाकण नाक्याकडे येणाऱ्या वाहनांना श्रीराम चौकात प्रवेश दिला जाणार नाही. ही वाहने छत्रपती शिवाजी महाराज प्रवेशद्वार, शांतीनगर उल्हासनगर आणि सम्राट चौक मार्गे वळवली जातील. हलक्या वाहनांसाठी, कल्याण पूर्वेतील रहिवाशांना कोळशेवाडी पोलीस स्टेशन किंवा विठ्ठलवाडी रेल्वे स्टेशन पूर्वेकडे किंवा तेथून प्रवास करणाऱ्यांना अंतर्गत रस्त्यांचा वापर करावा लागेल. या मार्गामध्ये काटेमानवली पुलाखालील हनुमान नगर, चिंचपाडा रोड आणि शंभर फूट रोड मार्गे जाणारा रस्ता आहे. श्रीराम चौकातून कल्याण पूर्वेकडे येणारी वाहने महिला उद्योग केंद्राजवळील विठ्ठलवाडी रेल्वे स्टेशनवरून किंवा खडवलीकडे जाणारा रस्ता वापरू शकतात.

# हळदी समारंभातील जेवण केल्याने ३० ते ४० लोकांना विषबाधा

**कल्याण (गणेश बागडे) :** कल्याण पश्चिमेतील हायप्रोफाईल मोहन प्राईड इमारतीतील बाविस्कर कुटुंबात शनिवारी रात्री हळदी समारंभा निमित्ताने जेवण जेवल्यानंतर ३०ते ४० जणांना उलट्या व जुलाब होऊ लागल्याने उपाचारार्थ रूग्णालयात नेण्याचा बाका प्रसंग ओढावला असल्याचा धक्कादायक प्रकार घडला आहे. प्राप्त माहिती नुसार, कल्याण पश्चिमेतील हायप्रोफाईल मोहन प्राईड इमारतीमधील बाविस्कर कुटुंबात मुलीचा हळदी समारंभ शनिवारी होता. या समारंभा निमित्ताने रात्री आलेल्या पाहुणे आणि कुटुंबायांनी जेवण केल्यानंतर काही तासांनी उलट्या व जुलाबाचा त्रास सुरू झाल्याने उपचारार्थ रूग्णालयात नेण्याचा प्रसंग ओढावला. या जेवणातील विषबाधेचा जास्त त्रास जेष्ठांना, बालकांना झाल्याचे समजते. यामध्ये ज्या मुलीची हळद होती ती, तिची आई, बहीण यांना देखील त्रास झाला. या धक्कादायक प्रकारामुळे रविवारी होणारा लग्न समारंभ कार्यक्रम रद्द करावा लागल्याचे कुटुंबियांच्या वतीने प्रसिध्दी माध्यामांना सांगितले. तसेच या घटना प्रकरणी जेवणाच्या कंत्राटदारावर खडकपाडा पोलीस स्टेशनमध्ये धाव घेत गुन्हा दाखल करून कारवाई ची मागणी केली असल्याचे समजते.

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत ठाणे जिल्ह्यात सेलिब्रिटींच्या गाव भेटी

**ठाणे (विशाल कारंडे) :** राज्य शासनाच्या "मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान" या महत्वाकांक्षी अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी व गावपातळीवर व्यापक जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने जिल्हा परिषद ठाणे यांच्या वतीने सेलिब्रिटी भेटींचे आयोजन करण्यात आले होते. या अभियानाच्या प्रचार व जनजागृतीसाठी अभिनेत्री शिवाली परब व अभिनेते पृथ्वीक प्रताप यांनी ठाणे जिल्ह्यातील विविध तालुक्यांतील गावांना भेट दिली. त्यानुसार दि. १८ जानेवारी २०२६ रोजी भिवंडी तालुक्यातील डोहळे, शहापूर तालुक्यातील भावसे–खोस्ते तसेच मुरबाड तालुक्यातील खेवारे येथे सेलिब्रिटी भेटीचे कार्यक्रम उत्साहात पार पडले. यावेळी अभिनेत्री शिवाली परब यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान हे गावाच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येत असून, प्रत्येक ग्रामस्थाने या अभियानात सक्रिय सहभाग नोंदवावा. स्पर्धात्मक स्वरूपात राबविण्यात येणाऱ्या या अभियानात सहभागी होऊन गावाने बक्षिसे मिळवावीत, असे आवाहन त्यांनी केले. अभिनेते पृथ्वीक प्रताप यांनी ग्रामस्थांना संबोधित करताना सांगितले की,



शासकीय विविध योजना गावातील प्रत्येक घटकांपर्यंत पोहोचविण्याच्या दृष्टीने मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान राबविण्यात येत आहे. अधिकारी व कर्मचारी वर्ग योजनांची प्रभावी अंमलबजावणी करत असून ग्रामस्थांनी या अभियानात मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून आपले गाव समृद्ध करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे मार्गदर्शन त्यांनी केले. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सांगितले की, शिक्षण, आरोग्य, स्वच्छता, पाणीपुरवठा आदी मूलभूत सुविधा ग्रामस्थांना उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज आहे. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत विविध उपक्रमांमध्ये ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून समृद्ध गावनिर्मितीसाठी पुढे यावे, असे आवाहन त्यांनी केले. या कार्यक्रमास आमदार दौलत भिका दरोडा, जिल्हा परिषद माजी सदस्य सुभाष (आप्पा) घरत, जिल्हा परिषद माजी सदस्य उल्हासभाऊ बांगर, माजी सभापती पंचायत समिती अनिल घरत प्रकल्प संचालक छायादेवी शिसोदे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) प्रमोद काळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे, कार्यकारी अभियंता प्रकाश सासे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (स्वच्छता व पाणीपुरवठा) पंडित राठोड, गटविकास अधिकारी (भिवंडी) गोविंद खामकर, गटविकास अधिकारी (शहापूर) बी. एच. राठोड, गटविकास अधिकारी (मुरबाड) लता गायकवाड, मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान राज्य समन्वयक यास्मिन शेख, ग्रामविकास अधिकारी, सरपंच यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत आंतरराष्ट्रीय बजाज पुणे ग्रँड टूर २०२६ चा भव्य शुभारंभ

## 'बजाज पुणे ग्रँड टूर २०२६' केवळ स्पर्धा नसून पुढील पिढ्यांसाठी टिकणारा वारसा - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**पुणे (अभिजीत येरल्लू) :** बजाज पुणे ग्रँड टूर २०२६ ही केवळ आंतरराष्ट्रीय सायकल स्पर्धा म्हणून मर्यादित न राहता पुढील पिढ्यांसाठी टिकून राहणारा पायाभूत आणि क्रीडा वारसा ठरणार आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. पुणे येथील जेडब्लू मेरियट हॉटेल मध्ये आयोजित या प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय बजाज पुणे ग्रँड टूरच्या शुभारंभ आणि आंतरराष्ट्रीय सायकलपटूंच्या स्वागतप्रसंगी ते बोलत होते. यावेळी केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, सामजिक न्याय राज्य मंत्री माधुरी मिसाळ, सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडियाचे महासचिव दातो मनिंदर पाल सिंग मंचावर उपस्थित होते. पुणे जिल्हा हा इतिहास, संस्कृती आणि आधुनिकतेचा संगम असल्याचे सांगताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, येथे प्रत्येक किलोमीटरवर शौर्य, परंपरा आणि संस्कृतीच्या कथा अनुभवायला मिळतील. पुणे हे सांस्कृतिक राजधानीबरोबरच तंत्रज्ञान, मॅन्युफॅक्चरिंग आणि आयटी क्षेत्रातील अग्रगण्य शहर असून, पश्चिम घाटाचे निसर्गसौंदर्य स्पर्धेला वैशिष्ट्यपूर्ण उंची देईल. ही स्पर्धा लवकरच जागतिक क्रीडा कॅलेंडरमधील प्रतिष्ठेची वार्षिक स्पर्धा बनेल. या माध्यमातून पुणे जिल्हा क्रीडा व पर्यटन क्षेत्रात आंतरराष्ट्रीय नकाशावर ठळकपणे येईल, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला. बजाज पुणे ग्रँड टूर २०२६ ही भविष्यातील अनेक




शतकांसाठी टिकणाऱ्या मार्गाची सुरुवात असल्याचे सांगत मुख्यमंत्री म्हणाले, स्पर्धेसोबत विविध पूरक उपक्रम राबवण्यात येणार असून, पर्यटकांना निसर्गासोबतच छत्रपती शिवाजी महाराजांच्या ऐतिहासिक किल्ल्यांचे दर्शन घेण्याची संधी मिळणार आहे. 'यूसीआय'च्या इतिहासात मैलाचा दगड ठरेल अशा रितीने ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी महाराष्ट्र शासन सर्वतोपरी सहकार्य करेल, अशी ग्वाही त्यांनी दिली. मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सर्व रायडर्सनी खिलाडूवृत्तीने स्पर्धा यशस्वी करण्याचे असे आवाहन केले. जगभरातील किमान ३५ देशांमधून आलेल्या आंतरराष्ट्रीय सायकलपटू, व्यवस्थापक, प्रशिक्षक आणि सहकारी अधिकाऱ्यांचे महाराष्ट्र शासनाच्यावतीने स्वागत करताना मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी स्पर्धेच्या भव्य आणि नेटक्या आयोजनासाठी पुणे जिल्हा प्रशासन व सर्व शासकीय यंत्रणांचे विशेष अभिनंदन केले. अत्यंत कमी कालावधीत आंतरराष्ट्रीय मानकांनुसार स्पर्धेची तयारी पूर्ण करणे हे उल्लेखनीय असून ४३७ किलोमीटर लांबीचे रस्ते जागतिक दर्जाच्या सायकलिंग स्पर्धेस अनुरूप विकसित करण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले. स्पर्धेसाठी केवळ रस्तेच नव्हे, तर आवश्यक संपूर्ण सुविधा उभारण्यात आल्या असून, कामाच्या अंमलबजावणीचा हा वेग अभूतपूर्व असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. गेल्या तीन दशकांतील प्रशासनातील अनुभवात पाहिलेला हा एखाद्या आयोजनाच्या तयारीचा सर्वोच्च वेग असल्याचे नमूद करत त्यांनी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे कौतुक केले. यावेळी पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी प्रास्ताविक करताना 'बजाज पुणे ग्रँड टूर २०२६' ही स्पर्धा पुणे व महाराष्ट्राच्या क्रीडा, पर्यटन आणि आंतरराष्ट्रीय प्रतिमेसाठी मैलाचा दगड ठरेल, असे नमूद केले.

### भारतीय पोशाखाचा असाही गौरव

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ज्या वेळी जगभरातून आलेल्या सायकलपटूंचे मंचावर स्वागत करत होते, त्यावेळी सर्वांच्या नजरा सायकलपटूंच्या पोशाखावर खिळल्या होत्या. कुर्ता, पायजमा आणि त्यावर जॅकेट... असा आपल्याकडच्या महोत्सवी पोशाखात सगळे खेळाडू उठून दिसत होते. या क्षणाने भारतीय संस्कृतीचा गौरव जागतिक पातळीवर अधोरेखित झाला. विविध भाषा, देश आणि संस्कृतींचे प्रतिनिधित्व करणारे सायकलिस्ट एकाच पारंपरिक वेशात मंचावर उभे राहिलेले दृश्य हे केवळ औपचारिक स्वागत नव्हते, तर "वसुधैव कुटुंबकम्" या भारतीय विचारधारेचे जिवंत दर्शन होते. कुर्ता,पायजमा आणि त्यावर जॅकेट या पोशाखातून भारतीय परंपरेचा सन्मान राखत या आंतरराष्ट्रीय पाहुण्यांनी आपुलकीने कार्यक्रमात सहभाग नोंदवला. या आगळ्या-वेगळ्या स्वागतामुळे भारतीय संस्कृती, आदरातिथ्य आणि जागतिक स्तरावर संवाद साधण्याची क्षमता ठळकपणे पुढे आली. खेळाच्या माध्यमातून संस्कृतींची सांगड घालणारा हा प्रसंग उपस्थितांसह जगभरातील प्रेक्षकांसाठीही स्मरणीय ठरला.

# बसेस उशिरा सोडल्यास होणार कारवाई

**रत्नागिरी (सचिन कदम) :** लांब व मध्यम पल्ल्याच्या एसटी बसेस वेळेवर सोडण्याचे आदेश एसटी महामंडळाने जिल्ह्यासह राज्यभरातील आगारास दिले आहे. त्यामुळे रत्नागिरी जिल्ह्यात बसेस नियोजननुसार सुटत असल्याने जिल्ह्यामधील आगारातील प्रवासी सेवेवर परिणाम फारसा दिसत नाही. जिल्ह्यातील पहिली एसटी बस सुटताना आगार व्यवस्थापक स्थानकात असणे गरजेचे असल्याचे सांगण्यात आले. एसटी बसेस वेळेवर सुटत नसल्यामुळे त्याचे परिणाम आगाराचे उत्पन्न व भारमानावर होत आहे. यामुळे आगार व्यवस्थपकांना दर सोमवारी पहिली बस सुटण्याच्या वेळेपासून आगारात उपस्थित राहण्याचे आणि सर्व फेऱ्या वेळेत सुटीत याची खातरजमा करण्याचे आदेश देण्यात आले होते. प्रत्येक आगार प्रमुखांची बसस्थानकात नियमित फेरी असते. वाहतूक महाव्यवस्थापकांनी दिलेल्या निर्देशानुसार आगार व्यवस्थापकांना दर सोमवारी बसस्थानकात



हजर राहून केलेल्या कामाचा तपशील स्वताच्या तसेच विभाग नियंत्रकांच्या नोंदवहीत नोंदवायचा आहे. आठवड्यातील प्रत्येक सोमवारी आगार प्रमुखांनी आगारातून पहिली बस सुटण्याच्या वेळेपासून हजर राहण्याचे आदेश असून काही बस स्थानकात आगार प्रमुखांना साडेपाच वाजल्यापासून बसस्थानक गाठावे लागते. आगारप्रमुखांना दिलेल्या सूचनांचे पालन होते का नाही याची आकस्मिक तपासणी विभाग नियंत्रक आणि विभागीय अधिकाऱ्यांकडे सोपवण्यात आली आहे.

# रायगड जिल्ह्यात ४२१ सर्पदंश रुग्णांवर यशस्वी उपचार

**रायगड (धनश्री सट्टा) :** रायगड जिल्ह्यात मागील वर्षात सर्पदंशाच्या घटनांमध्ये लक्षणीय वाढ झाल्याचे चित्र आहे. जिल्ह्यात एकूण ४२१ सर्पदंशग्रस्त रुग्ण उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात दाखल झाले होते. यापैकी बहुतांश रुग्णांवर वेळेवर आणि प्रभावी उपचार करण्यात आल्यामुळे त्यांना जीवदान मिळाले असून ते पूर्णपणे बरे होऊन घरी परतले आहेत. मात्र, दुर्दैवाने उपचारादरम्यान दोन रुग्णांचा मृत्यू झाला आहे. पावसाळयाच्या काळात शेतकाम, जंगलालगतची वस्ती, तसेच घराभोवती वाढलेली झुडपे यामुळे सर्पदंशाच्या घटनांमध्ये वाढ होते. रायगड जिल्ह्यातील ग्रामीण आणि दुर्गम भागात सापांचा वावर अधिक असल्याने या कालावधीत सर्पदंशाच्या घटना वाढल्या. जिल्हा रुग्णालय प्रशासनाने या पार्श्वभूमीवर सर्पदंश रुग्णांसाठी विशेष व्यवस्था उभारली होती. जिल्हा रुग्णालयात सर्पदंश उपचारासाठी आवश्यक असलेले अँटी-स्नेक व्हेनम (), आपत्कालीन औषधे, तसेच प्रशिक्षित डॉक्टर व परिचारिका २४ तास उपलब्ध ठेवण्यात आले होते. रुग्ण दाखल होताच तातडीने प्राथमिक तपासणी, आवश्यक चाचण्या आणि उपचार सुरू



करण्यात आले. यामुळे अनेक रुग्णांची प्रकृती गंभीर होण्यापूर्वीच नियंत्रणात आणण्यात यश आले. सर्पदंशानंतर पहिल्या काही तासांत उपचार मिळणे अत्यंत महत्त्वाचे असते. ज्या रुग्णांना वेळेवर रुग्णालयात दाखल करण्यात आले, त्यांची प्रकृती लवकर सुधारली. काही प्रकरणांमध्ये मात्र रुग्ण उशिरा दाखल झाल्यामुळे गुंतागुंत वाढली आणि त्यातून दोन रुग्णांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. आरोग्य विभागाने नागरिकांना सर्पदंश झाल्यास घरगुती उपाय किंवा अंधश्रद्धांवर विश्वास न ठेवता तात्काळ नजीकच्या शासकीय रुग्णालयात जाण्याचे आवाहन केले आहे. तसेच रात्रीच्या वेळी टॉर्चचा वापर, घराभोवती स्वच्छता, झुडपे काढणे आणि पायात चप्पल किंवा बूट घालणे अशा खबरदारीच्या उपाययोजना करण्याचेही आवाहन करण्यात आले आहे. जिल्हा रुग्णालयातील डॉक्टर, परिचारिका आणि आरोग्य कर्मचाऱ्यांच्या तत्पर सेवेमुळे मोठ्या प्रमाणात सर्पदंशग्रस्त रुग्णांचे प्राण वाचले आहेत. ही बाब आरोग्य व्यवस्थेच्या कार्यक्षमतेचे आणि समर्पित सेवेचे उत्तम उदाहरण ठरत असून, भविष्यातही अशाच प्रकारे सज्जता ठेवण्याचा निर्धार प्रशासनाने व्यक्त केला आहे.

# हिंद-दी-चादर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सामाजिक संघटनांनी पुढाकार घ्यावा - जिल्हाधिकारी राहुल कर्डिले

**नांदेड ( रघुनाथ कदम) :** 'हिंद-दी-चादर' अंतर्गत श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त नांदेड येथे २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी मोदी मैदान, नांदेड येथे भव्य-दिव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व सामाजिक संस्था, संघटना व स्वयंसेवी कार्यकर्त्यांनी सकारात्मकतेने पुढाकार घ्यावा व सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले. कार्यक्रमाच्या नियोजनासाठी जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथे आयोजित बैठकीत ते बोलत होते. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक अमोल इंगळे, कार्यकारी अधिकारी तथा समन्वयक डॉ. जगदीश सकवान,तहसीलदार संजय वारकड यांच्यासह विविध सामाजिक संस्था व संघटनांचे अध्यक्ष व प्रतिनिधी उपस्थित



होते. मोदी मैदानावर कार्यक्रमस्थळी सुमारे ३५० स्टॉल उभारण्यात येणार असून प्रत्येक सामाजिक संघटनेने किमान ५ ते १० स्टॉल उभारून भाविकांना सेवा द्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी राहूल कर्डीले यांनी केले. हे स्टॉल दोन्ही दिवस सकाळी ८ ते रात्री १० वाजेपर्यंत सुरू राहतील. प्रत्येक स्टॉलवर संबंधित संघटनेचे बॅनर लावण्यात येणार असून भाविकांसाठी पिण्याचे पाणी, प्रसाद, अल्पोपहार, माहिती व सेवा सुविधा उपलब्ध करून देण्याचे आवाहन करण्यात आले. तसेच २४ जानेवारी रोजी तख्त सचखंड श्री हजूर साहिब गुरुद्वारा येथून निघणाऱ्या पालखी मिरवणुकीचे स्वागत करून मोठ्या संख्येने सहभाग घेण्याचे आवाहन करीत या ठिकाणी भाविक मोठ्या प्रमाणावर उपस्थित राहणार असल्याने सेवा व्यवस्थेसाठी स्वयंसेवकांनी अधिकाधिक योगदान देण्याचे जिल्हाधिकारी श्री.कर्डिले यांनी सांगितले. या कार्यक्रमासाठी दोन दिवसांत ८ ते १० लाख भाविक नांदेडमध्ये दाखल होण्याची शक्यता असून, त्यामुळे सर्व प्रशासकीय यंत्रणांसह सामाजिक संघटनांनी सज्ज राहणे आवश्यक आहे, असे जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमाच्या बाहेर, पार्किंग स्थळी, स्टॉलसाठी आवश्यक साहित्य आणण्यासाठी वाहने व संबंधित व्यक्तींना प्रवेश पासेसची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली. हा कार्यक्रम केवळ धार्मिक नसून सामाजिक ऐक्य, सेवा आणि प्रेरणा देणारा ऐतिहासिक सोहळा असल्याने जास्तीत जास्त सामाजिक संघटनांनी पुढे येऊन सहभाग घ्यावा व "हिंद-दी-चादर" शहीदी समागम यशस्वी करण्यासाठी हातभार लावावा, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले. यावेळी कार्यक्रमाच्या एकूण नियोजनाची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर यांनी उपस्थितांना दिली.

# बारामतीत मका हमीभाव खरेदी केंद्र सुरू; शेतकऱ्यांना मोठा दिलासा

**बारामती (महेश पानसरे) :** बारामती कृषी उत्पन्न बाजार समितीच्या जळोची उपबाजार आवारात मका हमीभाव खरेदी केंद्र सुरू झाले आहे. बाजार आवारात लिलावामध्ये मकेचे दर हमीभावापेक्षा कमी निघत असल्याने तसेच शेतकरी संघटनेच्या मागणीवरून समितीने हमीभाव केंद्र सुरू करण्याची मागणी शासनाकडे केली होती. शासनाने मंजुरी दिल्यानंतर हे केंद्र सुरू करण्यात आले आहे. केंद्र शासनाचे किमान आधारभूत खरेदी योजनेंतर्गत हंगाम २०२५-२६ मध्ये मका खरेदीसाठी नाव नोंदणी सुरू आहे. ज्या मका उत्पादक शेतकऱ्यांनी ऑनलाइन नोंदणी केली नाही अशा शेतकऱ्यांनी २८ फेबुवारी पर्यंत नाव नोंदणी करून खरेदी केंद्राचा लाभ घ्यावा असे आवाहन बारामती कृषी उत्पन्न बाजार समितीने केले आहे. ऑनलाइन नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांना एसमएसद्वारे मका घेऊन येण्याची तारीख कळविली जाणार आहे. दिलेल्या तारखेलाच शेतकऱ्यांना मका आणावी. मकेचा हमीदर २४०० रुपये क्विंटल असून प्रतिएकर ९.५० क्विंटल मका घेण्यात येणार आहे. शासनाने दिलेल्या अटीनुसार आवश्यक कागदपत्रे जमा करून नावनोंदणी करावयाची आहे. सदरचे केंद्र जळोची उपबाजार



येथील भाजी मार्केट आवारातील गोदामात सुरू असल्याची माहिती सचिव अरविंद जगताप यांनी दिली. बाबालाल काकडे निरा कॅनॉल संघात ऑनलाइन नोंदणी सुरू आहे. आजवर २२० शेतकऱ्यांची नोंदणी पूर्ण झाली आहे. शेतकऱ्यांनी मका विक्रीसाठी आणताना ती वाळवून, पुरेशी स्वच्छ करूनच आणावी, असे आवाहन संघाचे अध्यक्ष सतीश काकडे यांनी केले आहे. बारामतीच्या पुरवठा अधिकारी तितिक्षा बारापात्रे, निरीक्षक कचरे, मार्केटिंग फेडरेशनचे प्रमोद लोखंडे, बाबालाल काकडे निरा कॅनॉल संघाचे व्यवस्थापक सुरेश काकडे, अमोल कदम, शशांक जगताप, प्रशांत मदने आणि बाजार समितीचे विभाग प्रमुख सूर्यकांत मोरे या वेळी उपस्थित होते.

# सैदापूर हद्दीत कृष्णा कॅनॉलला भगदाड



**कराड (शकिल शेख) :** कराड तालुक्यासह सांगली जिल्ह्यातील वाळवा, पलूस, तासगाव, मिरज तालुक्यांतील १३ हजार हेक्टर क्षेत्राला पाणीपुरवठा करणाऱ्या कृष्णा कॅनॉलला सैदापूर (ता. कराड) हद्दीत शनिवारी अचानक भगदाड पडले. त्यामुळे मोठ्या प्रमाणात पाणी ओढ्याला वाहिले. रब्बी हंगामातील पिकांसाठी कॅनॉलला पाणी सोडण्यात आले होते, त्यादरम्यान हा प्रकार घडला. ओढ्याला वाढलेले पाणी उसाच्या शेतात घुसल्याने काही प्रमाणात नुकसान झाले आहे. कृष्णा कालवा उपविभागाचे उपविभागीय अधिकारी उदय नांगरे यांनी तातडीने घटनास्थळी भेट देऊन कॅनॉलचे पाणी बंद केल्याने पुढील अनर्थ टळला. दरम्यान, मोरीचा तळ कमकुवत झाल्याने तो फुटला आहे. पुढील पंधरा दिवसांत दुरुस्तीचे काम पूर्ण करून कॅनॉलला पूर्ववत पाणी सोडण्यात येईल, अशी माहिती उदय नांगरे यांनी दिली. निधीअभावी कृष्णा कॅनॉलची ठिकठिकाणी मोठी दुरवस्था झाली आहे. कराड तालुक्यासह सांगली जिल्ह्यातील वाळवा, पलूस, तासगाव, मिरज तालुक्यांतील शेती व जनावरांच्या पाण्यासाठी हा कॅनॉल वरदान ठरला आहे. मात्र, कॅनॉलच्या डागडुजीकडे पाटबंधारे विभागाचे अक्षम्य दुर्लक्ष झाले आहे. कॅनॉलमध्ये मोठ्या प्रमाणात जलपर्णी उगवली आहे. पुलाजवळ प्लास्टिक व कचरा साचून राहिल्याने पाण्याचा प्रवाह गतीने पुढे सरकत नाही. कॅनॉलच्या मोऱ्यांनाही गळती लागली आहे. याचाच परिणाम म्हणून सैदापूर हद्दीत ओढ्यावरील नलिका मोरीचा तळ अचानक फुटला. कॅनॉलला पाच दिवसांपासून पाणी सोडण्यात आले आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात पाणी ओढ्याला वाहिले. ओढ्याची पाणी पातळी वाढल्याने कणसे यांच्या शेतात पाणी शिरून काही प्रमाणात नुकसान झाले आहे. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच उदय नांगरे यांनी घटनास्थळी भेट देऊन कॅनॉलचे पाणी तातडीने बंद केले. त्यामुळे नुकसान टळले. २२५ क्युसेक पाणी वाहिल्याचे नांगरे यांनी सांगितले.

# बैलोंडाखार येथे शेतकऱ्यांसाठी बायोचार निर्मिती आणि वापर प्रशिक्षण शिबीर संपन्न

**रायगड (भावना जैन) :** कृषी विभागाचा पुढाकार: शिवाजी आमले साहेब, विभागीय कृषी सहसंचालक ठाणे, यांचे सूचने नुसार व श्रीम.अर्चना सुळ, नारनवर तालुका कृषी अधिकारी, उरण यांच्या अध्यक्षतेखाली ,जमिनीचा पोत सुधारण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे आवाहनकेले आहे . शेतकऱ्यांनी शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून जमिनीची सुपीकता टिकवून ठेवावी, या उद्देशाने बेलोंडेखार या गावामध्ये शेतकऱ्यांसाठी 'बायोचार' (Bio-char) निर्मिती आणि वापराबाबत विशेष प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले होते. या प्रशिक्षणातून शेतकऱ्यांना टाकाऊ



कचऱ्यापासून उपयुक्त खत कसे तयार करावे, याचे सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमाला कृषी विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांची प्रमुख उपस्थिती होती. यामध्ये: श्रीमती आर. टी. नारनवर (तालुका कृषी अधिकारी)श्रीमती ए.डी.बुरकुल (उप कृषी अधिकारी) सहाय्यक कृषी अधिकारी, विभावरी चव्हाण. BTM नमिता वाकळे, गावचे पोलीस पाटील, दत्ताराम गोंधळी, तसेच गटाने शेती करणाऱ्या महिला शेतकरी उपस्थित होत्या. बायोचार: काळाची गरज या प्रशिक्षणाचे सहाय्यक कृषी अधिकारी श्रीम . विभावरी चव्हाण व BTM नमिता वाकळे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्यांनी बायोचार म्हणजे काय, याची सविस्तर माहिती दिली. "पीक कापणीनंतर उरलेला कचरा न जाळता, त्यापासून शास्त्रीय पद्धतीने बायोचार तयार केल्यास जमिनीला कर्ब (Carbon) मिळतो आणि पाण्याची धारण क्षमता वाढते," असे त्यांनी यावेळी स्पष्ट केले. प्रशिक्षणातील महत्त्वाचे मुद्दे:आहेत त्यात बायोचारचे फायदे: जमिनीचा पोत सुधारणे, सूक्ष्मजीवांची वाढ होणे आणि रासायनिक खतांवरील खर्च कमी होणे. निर्मिती पद्धती: शेतातील काडीकचरा, पिकांचे अवशेष यांचा वापर करून कमी ऑक्सिजनमध्ये ते जाळून कोळसा (बायोचार) तयार करण्याची प्रात्यक्षिके दाखवण्यात आली. वापर: हे खत पिकांना कशा प्रकारे द्यावे, याचे तांत्रिक नियोजन समजावून सांगितले. यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या शंकांचे निरसन केले आणि जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी सेंद्रिय शेतीकडे वळण्याचे आवाहन केले. तसेच शेतकऱ्यांनी ही आम्ही ह्या खरीप ला नक्कीच बायोचार चा उपयोग करू अशी ग्वाही दिली.

# ज्येष्ठ संगीतकार, पद्मविभूषण इलैयाराजा यांना यंदाचा पद्मपाणि पुरस्कार जाहीर




**वृत्तसंस्था :** मराठवाड्याचे नाव चित्रपट क्षेत्रात जागतिक व्यासपीठावर नेणारा 'अजिंठा-वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव' (AIFF) यंदा २८ जानेवारीपासून सुरू होत आहे. या ११ व्या महोत्सवाचे मुख्य आकर्षण म्हणजे, भारतीय चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ संगीतकार इलैयाराजा यांना यंदाचा प्रतिष्ठित 'पद्मपाणि पुरस्कार' प्रदान करण्यात येणार आहे, अशी माहिती महोत्सवाचे संस्थापक अध्यक्ष नंदकिशोर कागलीवाल, प्रमुख मार्गदर्शक अंकुशराव कदम आणि मानद अध्यक्ष तथा दिग्दर्शक आशुतोष गोवारीकर यांनी पत्रकार परिषदेत दिली. पद्मपाणि पुरस्कार निवड समितीने इलैयाराजा यांची निवड केली असून या समितीच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ समीक्षक लतिका पाडगांवकर तर सदस्यपदी चित्रपट दिग्दर्शक आशुतोष गोवारीकर, सुनील सुकथनकर व चंद्रकांत कुलकर्णी यांचा समावेश होता. पुरस्काराचे स्वरूप पद्मपाणि सन्मानचिन्ह, सन्मानपत्र व दोन लक्ष रूपये असे आहे. पद्मपाणि पुरस्कार प्रदान सोहळा मान्यवरांच्या हस्ते महोत्सव उद्घाटन कार्यक्रमात बुधवार, दि. २८ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ५:३० वाजता रुक्मिणी सभागृह, एमजीएम परिसर, छत्रपती संभाजीनगर येथे होणार आहे. तर महोत्सव पाच दिवस आयनॉक्स, प्रोझोन मॉल येथे संपन्न होणार आहे. गेल्या पाच दशकांहून अधिक काळ इलैयाराजा यांनी भारतीय चित्रपटसंगीतात सातत्यपूर्ण आणि सर्जनशील योगदान दिले आहे. त्यांनी ७,००० हून अधिक गाणी तसेच १,५०० पेक्षा अधिक चित्रपटांसाठी संगीत निर्मिती केली आहे. तामिळ, तेलुगू, मल्याळम, कन्नड, हिंदी, मराठी आदी विविध भारतीय भाषांमधील त्यांच्या संगीतरचनांनी रसिकांच्या मनात अढळ स्थान निर्माण केले आहे. कर्नाटकी संगीत, हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत व लोकसंगीताच्या बाजावर आधारलेले, तसेच पाश्चात्त्य सिम्फनीची शिस्त लाभलेले संगीत ही त्यांची प्रमुख ओळख आहे. चित्रपटातील प्रसंगांना भावनिक खोली देणारे पार्श्वसंगीत आणि कथानकाला पूरक ठरणारी संगीतरचना ही इलैयाराजा यांची प्रमुख ओळख आहे. कला, करुणा आणि सर्जनशील साधनेचे प्रतीक मानल्या जाणाऱ्या पद्मपाणि पुरस्कारासाठी इलयाराजा यांची निवड करण्यात आली आल्याचे पत्रकार परिषदेत नमूद करण्यात आले. नाथ ग्रुप, एमजीएम विद्यापीठ व यशवंतराव चव्हाण सेंटर प्रस्तुत व मराठवाडा आर्ट कल्चर व फिल्म फाउंडेशन आयोजित अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव हा केंद्रीय सूचना व प्रसारण मंत्रालय भारत सरकार, सांस्कृतिक कार्य विभाग महाराष्ट्र शासनाच्या सहकार्याने संपन्न होत आहे. प्रोझोन मॉल यांचे विशेष सहकार्य या फेस्टिव्हलला मिळालेले आहे. एनएफडीसी व महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी व सांस्कृतिक विकास महामंडळ, महाराष्ट्र शासन यांची सहप्रस्तुती असणार आहे. मराठवाड्याचे नाव चित्रपट क्षेत्रात जागतिक व्यासपीठावर नेणाऱ्या या महोत्सवात देशभरातील नागरीकांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन संयोजन समितीचे अध्यक्ष नंदकिशोर कागलीवाल, प्रमुख मार्गदर्शक अंकुशराव कदम, मानद अध्यक्ष आशुतोष गोवारीकर, सतीश कागलीवाल, एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास सपकाळ, महोत्सवाचे संचालक सुनील सुकथनकर, कार्यकारी संचालक चंद्रकांत कुलकर्णी, महोत्सवाचे संयोजक नीलेश राऊत, सहसंचालक जयप्रद देसाई व ज्ञानेश झोटींग, डॉ. अपर्णा कक्कड, श्वेता कागलीवाल, डॉ. आशिष गाडेकर, कला संचालक डॉ. शिव कदम, डॉ. रेखा शेळके, डॉ. प्रेरणा दळवी, शिव फाळके, प्रा. दासू वैद्य, डॉ. आनंद निकाळजे, सुबोध जाधव, अमित पाटील, निखील भालेराव आदींनी केले आहे.

## स्मार्टफोन वापरत नसतानाही बॅटरी का संपते?



**१. नेटवर्क सिग्नलशी सुरू असलेली कुस्ती:** तुमच्या बॅटरीचा सर्वात मोठा शत्रू म्हणजे कमकुवत नेटवर्क. जर तुमच्या भागात मोबाईल रेंज कमी असेल, तर तुमचा फोन सतत टॉवर शोधण्यासाठी धडपडत असतो. ही प्रक्रिया बॅटरीवर प्रचंड ताण देते. विशेषतः ५जी नेटवर्क शोधण्यासाठी फोनला सर्वाधिक ताकद लागते, तर वाय-फायवर फोन सर्वात कमी बॅटरी खर्च करतो. त्यामुळे रेंज नसेल तर बॅटरी वेगाने संपणार हे नक्की!

**२. बॅकग्राउंडमध्ये चालणारा छुपा खेळ :** आपण एखादं ॲप वापरून बंद केलं तरी ते पूर्णपणे थांबत नाही. फेसबुक, इंस्टाग्राम किंवा व्हॉट्सॲप यांसारखी अनेक ॲप्स बॅकग्राउंडमध्ये डेटा सिंक करत असतात. तुम्ही फोन वापरत नसतानाही ही ॲप्स सक्रिय राहून बॅटरीचा फन्ना उडवतात. जे ॲप्स तुम्ही रोज वापरत नाही, त्यांची बॅकग्राउंड ॲक्टिव्हिटी सेटिंगमध्ये जाऊन रिस्ट्रिक्ट करणे हाच यावर उपाय आहे.

**३. नोटिफिकेशन्सचा सारखा प्रकाश :**मोबाईलचा डेटा ऑन असेल तर दिवसभरात शेकडो नोटिफिकेशन्स येतात. जरी आपण फोन उघडून बघितला नाही, तरी प्रत्येक नोटिफिकेशन आल्यावर फोनचा डिस्प्ले १०-१५ सेकंदांसाठी ऑन होतो. ही छोटीशी गोष्ट दिवसभरात तुमच्या बॅटरीचा मोठा हिस्सा खर्च करते.

**४. जुनाट सॉफ्टवेअर आणि अपडेट्सचा अभाव ;** जर तुमच्या फोनमधील सॉफ्टवेअर किंवा ॲप्स अपडेट नसतील, तर त्यामध्ये बग्स अर्थात तांत्रिक दोष असू शकतात. हे दोष फोनच्या प्रोसेसरवर अनावश्यक लोड देतात आणि बॅटरी गरम होऊन डिस्चार्ज होऊ लागते. म्हणूनच फोन आणि ॲप्स नेहमी अपडेटेड ठेवणं गरजेचं आहे.

**५. साध्या उपायाने वाचवा बॅटरी :** तज्ज्ञांच्या मते, फोनची कार्यक्षमता टिकवून ठेवण्यासाठी आठवड्यातून किमान एकदा फोन रिस्टार्ट करणे अत्यंत आवश्यक आहे. यामुळे बॅकग्राउंडमध्ये अडकलेल्या नको असलेल्या प्रोसेस थांबतात आणि बॅटरीचे आयुष्य वाढते. त्यामुळे पुढच्या वेळी फोनची बॅटरी आपोआप संपली तर फोन खराब झालाय असं समजण्यापूर्वी या गोष्टी तपासून पाहा.

# 'कांटा लगा गर्ल' अभिनेत्री शेफाली जरीवालावर झाली होती काळी जादू? पतीचा धक्कादायक दावा; तिला स्पर्श केल्यावर...



**वृत्तसंस्था :** 'कांटा लगा गर्ल' अभिनेत्री शेफाली जरीवालावर काळी जादू करण्यात आली होती, त्यामुळेच तिचा मुत्यू झाला, असा दावा तिचा पती पराग त्यागी याने केला आहे. एका पॉडकास्टमध्ये परागने हा खळबळजनक दावा केला आहे आणि हे पूर्ण सत्य असल्याचे म्हटले आहे. शेफाली जरीवालाच्या निधनाने तिचे मित्र आणि कुटुंबीय धक्क्यात आहेत. संपूर्ण मनोरंजन सृष्टीला मोठा धक्का बसला होता. तिचा पती पराग त्यागी अजूनही या दुःखातून सावरण्याचा प्रयत्न करत आहे. आपल्या पत्नीच्या आठवणीत जीवन समर्पित करणाऱ्या परागने अलीकडेच शेफालीच्या मृत्यूबद्दल एक दावा केला आहे. पारस छाबडाच्या पॉडकास्टमध्ये परागने दावा केला आहे की, त्याच्या पत्नीवर काळी जादू करण्यात आली होती. काळ्या जादूच्या दाव्याबद्दल बोलताना पराग म्हणाला, "खूप लोक या गोष्टींवर विश्वास ठेवत नाहीत, पण माझा यावर खूप विश्वास आहे. जिथे देव आहे तिथे सैतानही आहे. लोकांना स्वतःच्या दुःखापेक्षा दुसऱ्याच्या सुखाचे जास्त दुःख आहे. मला नक्की माहित आहे की हे कोणी केले आहे. मी त्याच नाव घेऊ शकत नाही, पण कोणीतरी नक्कीच केले आहे आणि मला काहीतरी अघटित घडत असल्याचे जाणवत होते. एकदा नाही तर दोनदा मला असे वाटले. पहिल्यांदा ती त्यातून बाहेर पडली, पण यावेळी परिस्थिती खूप गंभीर होती. मला माहित नाही नक्की काय होते ते." पॉडकास्टमध्ये त्याने पुढे सांगितले की, शेफालीवर काळी जादू होण्याची ही दुसरी वेळ होती. तो म्हणाला, "जेव्हा मी पूजेला बसतो, तेव्हा मला जाणवते की काहीतरी चुकीचे आहे. ती खूप आनंदी मुलगी होती. मी तुम्हाला नेमकी लक्षणे सांगू शकणार नाही आणि मला त्यात जास्त खोलवरही जायचे नाही, पण तिला स्पर्श केल्यावर मला समजायचे की काहीतरी गडबड आहे. यावेळी त्रास जास्त होता, म्हणून मी पूजाही करून घेतली होती. मला पूर्ण खात्री आहे की हे कोणीतरी मुद्दाम केले आहे." शेफाली जरीवालाचे २७ जून रोजी हृदयविकाराच्या झटक्यामुळे निधन झाले होते. शेफालीला तिच्या पहिल्या 'कांटा लगा' या गाण्यासाठी सर्वात जास्त ओळखले जाते.

# ए.आर.रहेमान यांच्या वक्तव्याचा विपर्यास : जावेद अख्तर



**वृत्तसंस्था :** गेल्या ८ वर्षांत बॉलीवूडमधील सत्ता ही सर्जनशील नसलेल्यांच्या हातात गेली आहे, हे सर्जनशील नसलेले लोक गटबाजी आणि पक्षपातीपणे कामे देतात, कदाचित त्यामागे सांप्रदायिक भावही असू शकेल, अशा अर्थाने संगीतकार ए. आर. रहेमान यांनी केलेल्या विधानाचा विपर्यास केला जात आहे, असे मत प्रसिध्द गीतकार जावेद अख्तर यांनी केले आहे. आपण अश्लीलता आणि चुकीची भाषा असलेले चित्रपट नाकारतो, या दोन त्तत्वांमुळे आपण आजवर अनेक चित्रपट नाकारल्याचा दावाही त्यांनी केला.

अलीकडे ए. आर. रहेमान यांनी गेल्या आठ वर्षांत बॉलीवूडमध्ये आपल्याला खूपच कमी संधी मिळाल्या असल्याचे सांगितले. या संधी कमी होण्यामागे चित्रपटसृष्टी सांप्रदायिक होत चालली आहे, असे विधान केले होते. त्या पार्श्वभूमीवर जावेद अख्तर यांनी आपली मते माध्यमांसमोर व्यक्त केली आहेत. ए. आर. रहेमान यांना चित्रपटसृष्टीत प्रचंड आदर आहे. या आदरामुळे आणि संगीत क्षेत्रातील त्यांच्या कामामुळे, त्यांच्या व्यक्तीमुळे अनेकजण त्यांच्याशी संपर्क साधण्यास कचरतात, ते आवाक्याबाहेरचे संगीतकार आहे, असे छोट्या निर्मात्यांना, कंपन्याना वाटते असे मत त्यांनी नोंदवले. रहेमान कधीही असे विधान करतील, याबाबत जावेद अख्तर यांनी साशंकता व्यक्त केली. हिंदी चित्रपटसृष्टीत, विशेषतः तमिळ समुदायातील लोकांबाबत किंवा महाराष्ट्राबाहेरील लोकांबाबत पक्षपात होतो का, असा प्रश्न विचारला होता. यावर रहेमान यांनी आपण वैयक्तिकरित्या कोणत्याही भेदभावाला सामोरे गेलो नसल्याचे सांगितले, मात्र उद्योगातील सत्तासंरचनेत झालेला बदल हे एक कारण असू शकते, असे सूचित केले होते. जावेद अख्तर यांनी आपला चित्रपटसृष्टीतील कामाचा स्वानुभवही सांगितला. ते म्हणाले, मी काम करताना चित्रपटात अश्लीलतेचा अंश दिसला तरी मी त्या चित्रपटातून बाहेर पडतो.

# मानवाच्या अस्तित्वापूर्वी समुद्रात होता ४० फुटी सापाचा वावर



**वृत्तसंस्था :** शास्त्रज्ञांनी आतापर्यंतच्या सर्वात मोठ्या समुद्री सापाची ओळख पटवली आहे, ज्याच्या अवाढव्य आकारामुळे जगभरातील संशोधक थक्क झाले आहेत. 'पॅलिओफिस कोलोसियस' (Palaeophis colossaeus) असे नाव असलेला हा साप लाखो वर्षांपूर्वी समुद्रावर राज्य करत होता. हा साप आजच्या आधुनिक समुद्री सापांच्या तुलनेत कित्येक पटीने मोठा आणि शक्तिशाली शिकारी होता. अभ्यासानुसार, हा महाकाय साप ५.६ कोटी ते ३.४ कोटी वर्षांपूर्वी (इओसीन युग) अस्तित्वात होता. आजचे समुद्री साप साधारणपणे २ ते ३ मीटर लांब असतात, मात्र पॅलिओफिस कोलोसियसची लांबी ८ ते १२ मीटर (सुमारे २६ ते ४० फूट) इतकी होती. शास्त्रज्ञांना या सापाच्या पाठीच्या कण्याचे जे अवशेष मिळाले आहेत, ते आतापर्यंत सापडलेल्या कोणत्याही सापाच्या तुलनेत असामान्यपणे मोठे आहेत. या सापाचे अवशेष ज्या भागात सापडले, तो भाग एकेकाळी उत्तर आफ्रिकेला व्यापून असलेल्या 'ट्रान्स-सहारा सीवे' नावाचा उथळ समुद्र होता. आज जिथे सहाराचे वाळवंट आहे, तिथे एकेकाळी उष्ण आणि किनारपट्टीचे पाणी होते. शास्त्रज्ञांच्या मते हा साप खोल समुद्राऐवजी उथळ पाण्यात राहणे पसंत करायचा. त्या काळातील जास्त तापमानामुळे या मोठ्या सरपटणाऱ्या जीवांना जगणे सोपे झाले होते. अन्नासाठी तो मोठ्या माशांसह शार्क आणि मगरीसारख्या दिसणाऱ्या 'डॉयरॅसॉरिड' प्राण्यांची शिकार करत असावा. आजच्या काळातील सर्वात लांब समुद्री साप (पिवळा समुद्री साप) जास्तीत जास्त ३ मीटरपर्यंत वाढतो. जमिनीवर आढळणारा आतापर्यंतचा सर्वात लांब साप 'टायटॅनोबोआ' (हा देखील आता नामशेष झाला आहे) याच्याशी तुलना केली असता, पॅलिओफिस कोलोसियस हा त्याला तगडी टक्कर देणारा जलचर होता. संशोधकांकडे हा साप नेमकी कशाची शिकार करायचा याचा थेट पुरावा नसला तरी, त्याच्या आकारावरून असा अंदाज लावला जातो की त्याला मोठ्या शिकारीची गरज होती. जर या सापाची कवटी आधुनिक सापांप्रमाणे लवचिक असेल, तर तो मोठ्या शार्क किंवा मगरींना अख्खे गिळंकृत करण्याची क्षमता ठेवत असावा.

# अथर्व तायडेचं शानदार शतक, विदर्भानं पहिल्यांदाच जिंकली विजय हजारे स्पर्धा; फायनलमध्ये सौराष्ट्राचा पराभव

**वृत्तसंस्था :** विदर्भ क्रिकेट संघानं २०२५-२६ मध्ये विजय हजारे करंडक जिंकून इतिहास रचला. २०२४-२५ च्या पराभवाचा बदला घेत, उच्च धावसंख्येच्या अंतिम सामन्यात, विदर्भानं सौराष्ट्राचा ३८ धावांनी पराभव केला. सामन्यात प्रथम फलंदाजी करताना, विदर्भानं ५० षटकांत ८ बाद ३१७ धावांचा मोठा आकडा उभारला. प्रत्युत्तरात सौराष्ट्राचा संघ २७९ धावांवर गारद झाला. अथर्व तायडेला सामनावीराचा पुरस्कार देण्यात आला, तर अमन मोखाडेला मालिकावीराचा पुरस्कार देण्यात आला. विदर्भाच्या विजयाचा पाया तरुण फलंदाज अथर्व तायडेनं रचला, ज्यानं १२८ धावा केल्या, त्याच्या लिस्ट-ए कारकिर्दीतील तिसरं शतक झळकावलं. तायडेला यश राठोड (५४) नं उत्तम साथ दिली, ज्यानं डावाचं नेतृत्व केलं. सामन्यापूर्वी ध्रुव शोरेनं पाठदुखीमुळे माघार घेतली असली तरी, विदर्भाच्या फलंदाजीवर कोणताही परिणाम झाला नाही. अथर्व तायडे आणि अमन मोखाडे यांनी पहिल्या विकेटसाठी ८० धावांची भागीदारी करत स्थिर सुरुवात केली. मोखाडे 33 धावांवर बाद झाला. तिसऱ्या क्रमांकावर आलेल्या यश राठोडनं आघाडीची भूमिका बजावली आणि तायडेला मोकळेपणानं खेळण्याची संधी दिली. डावाच्या सुरुवातीलाच तायडेला दोन जीवदान मिळाले, ज्याचा त्यानं पूर्ण फायदा घेतला. त्याच्या अर्धशतकानंतर, त्यानं आक्रमक खेळी करत शतक गाठण्यासाठी मोठे शॉट्स खेळले. मात्र, शेवटच्या षटकांमध्ये अंकुर पनवार (४ बळी) आणि चेतन साकारिया यांच्या चुरशीच्या गोलंदाजीमुळं, विदर्भ शेवटच्या पाच षटकांमध्ये फक्त ३६ धावाच जोडू शकला. ३१७ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना, सौराष्ट्राला सुरुवातीलाच पराभव पत्करावा लागला. मात्र, प्रेराक मंकडनं दमदार लढत देत ८८ धावा करुन संघाला सामन्यात टिकवून ठेवलं. कर्णधार हर्ष दुबेनं ३८ व्या षटकात मंकडला एलबीडब्ल्यू बाद करुन सामना पार बदलून टाकला. ही विकेट ९३ धावांच्या महत्त्वाच्या भागीदारीचा शेवट ठरली. त्यानंतर सौराष्ट्राची अपेक्षा चिराग जानी (६४) वर होती, परंतु विदर्भाच्या वेगवान गोलंदाजांनी शेवटच्या षटकांमध्ये शानदार कामगिरी केली. दर्शन नळकांडेच्या एका शानदार स्लोअर चेंडूवर जानीची विकेट गेली, ज्यामुळं सौराष्ट्राचा डाव अडखळला. त्यानंतर यश ठाकूर (४ विकेट) आणि नचिकेत भुते (३ विकेट) यांनी जलद विकेट घेत विदर्भाचा ऐतिहासिक विजय निश्चित केला. जेतेपदाच्या सामन्यात दव असूनही, विदर्भाच्या वेगवान गोलंदाजांनी चमकदार गोलंदाजी केली. संपूर्ण स्पर्धेत चमकदार कामगिरी करणाऱ्या विदर्भाला यावेळी संघाला विजेतेपद जिंकण्यापासून रोखता आलं नाही. सलग दुसऱ्यांदा अंतिम सामना खेळल्यानंतर, विदर्भानं संधी सोडली नाही आणि विजय हजारे करंडक जिंकून इतिहास रचला.



# सावरोली टोलनाक्याजवळ कोट्यवधींचा गुटखा तस्करीचा पर्दाफाश; खालापूर पोलिसांची मोठी कारवाई

## कंटेनरसह दोघांना अटक, १ कोटी ३ लाखांचा मुद्देमाल हस्तगत

**रायगड (विशेष प्रतिनिधी) :** मुंबई- पुणे एक्सप्रेस वेवरून कोट्यवधी रुपयांचा प्रतिबंधित गुटखा वाहतूक करणाऱ्या दोघांच्या मुसक्या खालापूर पोलिसांनी आवळल्या आहेत. जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सुरू असलेल्या कडक बंदोबस्तात ही कारवाई करण्यात आली असून, पोलिसांनी तब्बल १ कोटी ३ लाख ३४ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. खालापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत सावरोली टोलनाक्याच्या अलीकडे ही धडक कारवाई करण्यात आली. एमएच-40-डी सी-2265 क्रमांकाच्या कंटेनरमधून अवैधरीत्या ६३ लाख ३४ हजार २०० रुपये किमतीचा प्रतिबंधित सुगंधित तंबाखूयुक्त पान मसाला (गुटखा) वाहतूक केली जात असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली महामार्ग पोलीस मदत केंद्र बोरघाट व खालापूर पोलिसांनी संयुक्त कारवाई करत सदर कंटेनर अडवून तपासणी केली. तपासणीदरम्यान कंटेनरचे दोन्ही सील तुटलेले आढळून आले. तसेच चालकाकडे मालाची वैध कागदपत्रे, ई-वे बिल नसून, सादर करण्यात आलेल्या इनव्हॉईसवर कोणतीही सही, शिक्का किंवा पाठवणारा-घेणाऱ्याचा पत्ता नसल्याने पोलिसांचा संशय अधिकच बळावला. यानंतर कंटेनर खालापूर पोलीस ठाण्यात आणून अन्न व औषध प्रशासन विभागाच्या उपस्थितीत हा पंचनामा करण्यात आला आणि तपासणीमध्ये मोठ्या प्रमाणावर प्रतिबंधित गुटख्याचा साठा आढळून आला. या प्रकरणी शेख रशीद शेख रहमान (वय ४०, रा. अकोला), गणेश देविदास वानखेडे (वय २५, रा. अकोला) यांना अटक करण्यात आली असून त्यांच्याविरोधात भारतीय न्याय संहिता व अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुटखा नेमका कोठून आणला, त्याचा मूळ मालक कोण आहे व यामागे मोठे रॅकेट आहे का, याचा सखोल तपास सुरू असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले. तसेच ही कारवाई पोलीस अधीक्षक आँचल दलाल, अपर पोलीस अधीक्षक अभिजित शिवथरे, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. विशाल नेहूल यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली असून खालापूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सचिन पवार व त्यांच्या पथकाने ही यशस्वी कारवाई केली आहे. या कार्यवाही पथकात सहाय्यक पोलीस निरीक्षक स्वप्नील पाटील (महामार्ग पोलीस मदत केंद्र बोरघाट), पोलीस उपनिरीक्षक नितीन सांगळे, पोलीस हवालदार बाळा जाधव, दिनेश भोईर, शिवाजी बोडके, संदेश कावजी, दशरथ मोकल, पोलीस शिपाई कृष्णा मुंडे, पुष्पलवार आदी उपस्थित होते.



### जनतेस पोलिसांचे आवाहन

अवैध, प्रतिबंधित अंमली पदार्थांची वाहतूक, साठवणूक किंवा विक्रीची माहिती मिळाल्यास नागरिकांनी तात्काळ डायल ११२, रायगड दृष्टी व्हॉट्सअॅप क्रमांक ७६२००३२९३१ किंवा नजीकच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन रायगड पोलिसांकडून करण्यात आले आहे.

## रसायनी पोलिसांची धडाकेबाज कारवाई

# अवघ्या काही तासांत ३.१० लाखांचा मुद्देमाल चोरणाऱ्या दोन चोरट्यांना अटक

**रायगड (विशेष प्रतिनिधी) :** रसायनी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील भोकरपाडा गावच्या हद्दीत,जुना मुंबई–पुणे हायवेवरील एलटीआर रियालिटी-क्रिस्टोरिया इस्टेट ट्रेनिंग सेंटर येथे झालेल्या मोठ्या चोरीचा गुन्हा रसायनी पोलिसांनी अवघ्या काही तासांत उघडकीस आणत दोन सराईत चोरट्यांना अटक करून तब्बल ३ लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. दिनांक १० जानेवारी रोजी रात्रीच्या सुमारास, अज्ञात चोरट्यांनी कंपनीच्या कन्स्ट्रक्शन साईटला असलेल्या वॉल कंपाऊंड व तारेच्या कुंपणातून प्रवेश करून मोठ्या प्रमाणावर बांधकामासाठी लागणारा साहित्य चोरी करून नेला होता. या चोरीमध्ये २,३०,०००/- रुपये किमतीचे कन्स्ट्रक्शनसाठी लागणारे २३ लोखंडी 'माय वन' शीट, ८०,०००/- रुपये किमतीचे कन्स्ट्रक्शन सेंटरिंगसाठी लागणारे १७ अॅल्युमिनियम पॅनल व सेंटरिंग लॉक, असा एकूण ३,१०,०००/- रुपयांचा मुद्देमाल चोरट्यांनी लंपास केला होता. या प्रकरणी प्रसन्ना शांताराम गडकर (रा. ऐरोली,जि. ठाणे) यांनी रसायनी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.तक्रार मिळताच रसायनी पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत तांत्रिक विश्लेषण व गुप्त बातमीदारांच्या मदतीने अवघ्या काही तासांत चोरीचा छडा लावला. अटक करण्यात आलेले आरोपी: नौशाद अहमद अब्दुल लतीफ कुरेशी (वय ४०) रा.धारावी, मुंबई, योगेश लक्ष्मण भोंडगे (वय ३०) रा. हातनोली–चौक,ता. खालापूर, या दोघांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून चोरीस गेलेला संपूर्ण मुद्देमाल हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले आहे. सदर आरोपींना न्यायालयाने १९ जानेवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. आरोपींविरुद्ध बि.एन.एस. कलम ३०५, ३(५) अन्वये रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई रायगड जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षक श्रीमती आंचल दलाल, अप्पर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे, खालापूरचे पोलीस उपविभागीय अधिकारी डॉ.विशाल नेहूल यांच्या मार्गदर्शनाखाली, रसायनी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय बांगर यांच्या नेतृत्वाखाली गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक मंगेश बाचकर,सहाय्यक फौजदार लालासाहेब कोळेकर,पोलीस हवलदार रणजीत खराडे,श्री. नगरकर यांनी सदरचा गुन्हा उघडकीस आणला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोलीस उपनिरीक्षक मंगेश बाचकर करीत आहेत.रसायनी पोलिसांच्या या तत्पर व धडाकेबाज कारवाईमुळे परिसरात गुन्हेगारांमध्ये दहशत निर्माण झाली असून नागरिकांमधून पोलिसांच्या कार्याचे कौतुक होत आहे.

## वयोवृद्ध शेत वस्तीवर राहणाऱ्या लोकांवर दरोडा घालणाऱ्या

# चार आरोपीला स्थानिक गुन्हे शाखा धाराशिवने केले गजाआड

**धाराशिव (विशेष प्रतिनिधी) :** धाराशिव तालुक्यातील उपळा शेत वस्तीत दरोडा टाकत अज्ञात दरोडेखोराकडून वृध्द महिलेला मारहाण करू सोन्या चांदीचे दागिने चोरीची घटना दिनांक ७ जानेवारी २०२६च्या मध्ये रात्री घडली होती या अनुषंगाने धाराशिव पोलीस अधीक्षक रेतू खोखर यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद इज्जपवार घटनेच्या अनुषंगाने सुचना देत तात्काळ तपास करून नमूदचा गुन्हा उघडकीस आणणेबाबत आदेशित केले शनिवार (दि १०) रोजी धाराशिव स्थानिक गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सुदर्शन कासार व पथक यांना गोपनीय बातमीदारा मार्फत सदर गुन्ह्यातील आरोपी बाबत माहिती प्राप्त झाली. पथकाने मिळालेल्या बातमीवरून कळंब तालुक्यातील मोहा येथील पारधी पिढीवर छापा टाकून ०४ संशयित ताब्यात घेतले. नमूद आरोपींना विश्वासात घेऊन त्यांच्याकडे चौकशी केली असता त्यांनी सदर गुन्हा केल्याचे कबूल केले. तसेच दिनांक १७.१२.२०२५ रोजी विमानतळ परिसर धाराशिव येथे दरोडा टाकला असल्याची तसेच, गोळेगाव ता वाशी, अंतरवली ता भूम या ठिकाणीही चोरी केली असल्याचे सांगितले, पोलिसांनी आरोपीकडून नमूद गुन्ह्यातील १६.२ ग्रॅम वजनाचे दागिने जप्त केले आहेत. तसेच नमूद आरोपीकडून चोरीच्या ०४ मोटरसायकल जप्त करण्यात आल्या, शिर्डी व जामखेड येथील आहेत. अशाप्रकारे स्थानिक गुन्हे शाखेने नमूद आरोपीकडून दरोडा, जबरी चोरी आणि मोटरसायकल चोरीचे एकूण ०८ गुन्हे उघडकीस आणून त्यांच्याकडून एकूण ०२,०७,००० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे- अनिल उर्फ लल्ल्या बादल शिंदे, छगन श्रीपती काळे, बिभीषण उर्फ बबड्या दिलीप काळे, विजय उर्फ तुंबड्या आप्पा पवार सर्व रा मोहा ता. कळंब जि धाराशिव अशी असून नमूद आरोपी आणि जप्त मुद्देमाल करून आरोपींना धाराशिव ग्रामीण पोलीसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. तसेच यातील आरोपी धाराशिव आणि बाहेर जिल्ह्यातील दरोडा जबरी चोरी सारख्या गुन्ह्यातील आरोपी असल्याची माहिती समोर आली आहे. सदर कारवाई ही धाराशिव पोलीस अधीक्षक रितु खोखर, अपर पोलीस अधीक्षक शफकत आमना यांचे मार्गदर्शनाखाली धाराशिव स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस विनोद इज्जपवार, सहाय्यक पोलीस निरीक्षक सुदर्शन कासार, पोलिस हवालदार शौकत पठाण, जावेद काझी, प्रकाश औताडे, फरहान पठाण, महिला पोलिस हवालदार शोभा बांगर, चालक पोलीस हवालदार रत्नदीप डोंगरे, नवनाथ गुरव यांनी केली आहे.

# मित्राच्या घरी चोरी करणाऱ्या मित्रांचा स्थानिक गुन्हे शाखेने केला पर्दाफाश

## सोन्याचे दागीने व रोख रक्कम असे एकुण ७९,७८० रूपये चा मुददेमाल जप्त

**धाराशिव (विशेष प्रतिनिधी) :** मित्राने उसने पैसे देऊन त्याचे व्याज म्हणून जास्त पैसे परत घेतल्याचे मनात राग ठेवून तीन मित्रांनी मिळून मित्राच्या घरात केली चोरी करून सोन्याचे दागीने व रोख रक्कम असे एकुण ७९,७८० रूपये चा ऐवजी चोरी केली धाराशिव स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तापस चक्र फिरवत अटक केली. धाराशिव जिल्हयातील मालाविषयी गुन्हे उघडकीस आणणेकामी धाराशिव पोलीस अधीक्षक रितू खोखर यांच्या मार्गदर्शनाखाली धाराशिव स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद





इज्जपवार यांच्या नेतृत्वाखाली धाराशिव शहरात पेट्रोलिंग करीत असताना पथकास गुप्त बातमी मिळाली धाराशिव शहर पोलिस ठाण्याच्या हद्दीत घरफोडी करणारे आरोपी नामे १) स्वप्नील सतीश जेटोथोर २) श्वेत सुनिल चिलवंत ३) निखील किरण सोनवणे सर्व रा.धाराशिव यांनी केला आहे अशी माहिती मिळाल्याने पथकाने धाराशिव शहरात नमुद आरोपीचा शोध घेतला असता ते धाराशिव शहरात मिळुन आल्याने त्यांना ताब्यात घेवुन स्थागुशा कार्यालय धाराशिव येथे आणुन त्यांना विश्वासात घेवुन त्यांचेकडे नमुद गुन्हयाचे अनुषंगाने चौकशी केली असता त्यांनी सांगीतले की सदर गुन्हयातील फिर्यादी शुध्दोधन गायकवाड याने यातील आरोपींना उसने पैसे देवुन त्याचे जास्त व्याज घेतले होते म्हणून आरोपीनी संगणमत करुन फिर्यादीचे घरी कुरणेनगर येथे चोरी केली असल्याचे कबुल केले. आरोपीचे ताब्यातुन सोन्याचे दागीने व रोख रक्कम असे एकुण ७९,७८० रू.चा मुददेमाल जप्त केला. सदर कारवाई ही धाराशिव पोलीस अधिक्षक रितु खोखर व अपर पोलीस अधिक्षक शफकत आमना, यांचे मार्गदर्शनाखाली धाराशिव स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्विनोद इज्जपवार, सहाय्यक पोलिस निरीक्षक सचिन खटके, पोलीस हवालदारनितीन जाधवर, पोलिस नाईक बबन जाधवर, चालक पोलीस हवालदार महेबुब अरब, रोहीत दंडनाईक यांचे पथकाने केली आहे.

# कोंडिग्रेतील बनावट दारूनिर्मिती कारखान्यावर छापा; तिघांना बेड्या

**कोल्हापूर (विशेष प्रतिनिधी) :** कोंडिग्रे (ता. शिरोळ) येथील बनावट दारूनिर्मिती करणाऱ्या कारखान्याचा राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या भरारी पथकाने शनिवारी भांडाफोड केला. कोंडिग्रे येथील शेतात शेडवर छापा टाकून पथकाने सुमारे २ लाख २५ हजार रुपये किमतीच्या बनावट दारूने भरलेल्या ३७५ बाटल्या व तीन मोटारी, असा एकूण १६ लाख ९५ हजार ५५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी मुख्य संशयित दत्तात्रय भीमराव बंडगर (वय ४९, रा. हनुमान मंदिरजवळ, संजयनगर, सांगली), अवधूत राजेंद्र पिसे (३०, महादेव मंदिरजवळ, पिसे गल्ली, दानोळी, ता. शिरोळ), संतोष कुमार कांबळे (३०, कोंडिग्रे, ता. शिरोळ) या तिघांना बेड्या ठोकल्या. दरम्यान, दत्तात्रय बंडगर



हा सराईत गुन्हेगार असून, त्याला यापूर्वी दारू तस्करीप्रकरणी अटक झाली होती. राज्य उत्पादन शुल्क कोल्हापूर विभागाच्या अधीक्षक स्नेहलता नरवणे, उपअधीक्षक युवराज शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली भरारी पथकाने ही कारवाई केली. संशयित दत्तात्रय बंडगर, अवधूत पिसे, संतोष कांबळे हे गोव्यातील म्हापसा येथून गोवा बनावटीची दारू कोंडिग्रे येथे आणून महाराष्ट्रातील विविध ब्रँडच्या रिकाम्या बाटल्यांमध्ये भरून सर्रासपणे विक्री करीत होते. सुमारे दीड वर्षापासून हा गोरख धंदा सुरू होता. राज्य उत्पादन शुल्क विभागाला याची माहिती मिळताच भरारी पथकाने कोंडिग्रे (ता. शिरोळ) येथील शेतात असलेल्या पत्र्याच्या शेडवर छापा टाकून बनावट दारू कारखान्याचा पर्दाफाश केला. संशयितांकडून विदेशी मद्याच्या विविध ब्रँडच्या सीलबंद बाटल्या, बनावट बूच लावलेल्या बाटल्या, भेसळ दारूने भरलेल्या ३७५ बाटल्या, असा २ लाख २५ हजार रुपये किमतीचा दारूसाठा, तीन मोटारी असा एकूण १६ लाख ९५ हजार ५५० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आल्याचे अधीक्षक स्नेहलता नरवणे, उपअधीक्षक शिंदे यांनी सांगितले. बनावट दारूनिर्मिती करणाऱ्या या रॅकेटमध्ये गोव्यासह कोल्हापुरातील आणखी काही संशयित सक्रिय असल्याची माहिती आहे. संबंधितांना लवकरच अटक करण्यात येईल, असे अधीक्षक स्नेहलता नरवणे यांनी सांगितले. यावेळी छापा टाकलेल्या पथकातील निरीक्षक सदानंद मस्करे, अभयकुमार साबळे, अजय वाघमारे, कांचन सरगर हे उपस्थित होते.

# नशामुक्त भारत अभियानांतर्गत सफाळा येथे दोघांवर एनडीपीएस अंतर्गत कारवाई

**पालघर (विशेष प्रतिनिधी) :** नशामुक्त भारत अभियानाच्या अंमलबजावणीदरम्यान सफाळा पोलीस ठाण्याच्या पथकाने अंमली पदार्थ सेवनाविरोधात प्रभावी कारवाई करत दोन इसमांविरुद्ध अंमली पदार्थ व मनोविकारक द्रव्ये प्रतिबंधक कायदा (एनडीपीएस) अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. ही कारवाई गुरुवारी (दि. १६ जानेवारी) रोजी नियमित गस्त व प्रतिबंधात्मक कारवाईदरम्यान करण्यात आली. सफाळा पोलीस ठाण्याच्या हद्दीत गस्त घालत असताना पोलिसांना दोन इसम संशयास्पदरीत्या वावरताना आढळून आले. त्यांना थांबवून चौकशी केली असता ते अंमली पदार्थांचे सेवन करत असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर पोलिसांनी दोघांना तात्काळ ताब्यात घेऊन कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करत वैद्यकीय तपासणीसाठी पाठविले. वैद्यकीय अहवालात दोघांनीही अंमली पदार्थांचे सेवन केल्याचे स्पष्ट झाले. ताब्यात घेण्यात आलेल्या इसमांमध्ये सत्यकुमार हिरालाल राजभर (वय २५ वर्षे, व्यवसाय मजुरी, रा. नंदाडे, पोस्ट उंबरपाडा, ता. व जि. पालघर) आणि सलमान शरीफ शेख (वय २५ वर्षे, व्यवसाय मजुरी, रा. नंदाडे, पोस्ट सफाळा, ता. उंबरपाडा, जि. पालघर) यांचा समावेश आहे. या प्रकरणी दोघांविरुद्ध सफाळा पोलीस ठाण्यात एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक पालघर मा. यतीश देशमुख (भा.पो.से.), अपर पोलीस अधीक्षक मा. विनायक नरळे तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी मा. विकास नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. सहायक पोलीस निरीक्षक दत्ता शेळके, पोलीस उपनिरीक्षक दिपविजय भवर, सहा. फौजदार कल्पेश किणी व पोलीस हवालदार शिवाजी चिमकर यांनी या कारवाईत सक्रिय सहभाग नोंदविला. सफाळा पोलीस ठाणे हद्दीत अंमली पदार्थांचे सेवन व संबंधित गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी विशेष मोहीम सातत्याने राबविण्यात येत असून भविष्यातही अशा प्रकारच्या गैरकृत्यांवर कठोर व कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा पोलिसांनी दिला आहे. अंमली पदार्थांच्या दुष्परिणामांचा विचार करता युवकांनी व नागरिकांनी व्यसनांपासून दूर राहावे, तसेच अंमली पदार्थांबाबत माहिती असल्यास ती गोपनीय ठेवून त्वरित जवळच्या पोलीस ठाण्यात किंवा हेल्पलाईन क्रमांक ११२ वर कळवावे, असे आवाहन पोलिस प्रशासनाने केले आहे.

# दमण बनावटीच्या मद्य वाहतुकीविरोधात कारवाई



**पालघर (विशेष प्रतिनिधी) :** उत्पादन शुल्क विभागाचा डहाणू विभाग व भरारी पथकाने जव्हार नाशिक रस्त्यावरील साकी हॉटेल समोर संयुक्तपणे केलेल्या कारवाईत केंद्र शासित दादरा नगर हवेली, दमण व दिव मध्ये विक्रीसाठी असलेले परराज्यातील मद्य साठा जप्त करण्यात आला आहे. कारवाईत तब्बल ३७ लाख ३० हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. दमण बनावटीच्या दारूची तस्करी होणार असल्याच्या गोपनीय माहिती नुसार उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी जव्हार शहरातील जव्हारनाशिक रस्त्यावर साकी हॉटेलसमोर सापळा रचला होता.दरम्यान पहाटेच्या सुमारास उत्पादन शुल्क विभागाच्या पथकाने भरधाव वेगाने जाणाऱ्या एका संशयास्पद टेम्पोचा पाठलाग करून थांबवत टेम्पोची तपासणी केली. यावेळी टेम्पो मध्ये परराज्यातील मद्याचा साठा आढळून आला. टेम्पो मधील २१५ बॉक्स मधील दारू साठा जप्त करण्यात आले.यात १३७३.७६ बल्क लिटर विदेशी दारू तसेच ६७२ बल्क लिटर बिअरचा समावेश आहे.

# मंगेश काळोखे हत्याकांडातील आरोपी भरत भगतला बेड्या

**रायगड (विशेष प्रतिनिधी) :** खोपोली येथील बहुचर्चित मंगेश काळोखे हत्याकांड प्रकरणात मोठी कारवाई समोर आली आहे. या हत्येचा कट रचल्याचा आरोप असलेला फरार आरोपी राष्ट्रवादी काँग्रेसचा प्रवक्ता भरत भगत याला खोपोली पोलिसांनी अटक केली आहे. खालापूर परिसरातून ही अटक करण्यात आली असून या कारवाईमुळं संपूर्ण रायगड जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे. मात्र या प्रकरणातील आणखी एक मुख्य आरोपी राष्ट्रवादी जिल्हाध्यक्ष सुधाकर घारे अद्याप फरार असून त्यांचा शोध सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली. खोपोली येथील नवनिर्वाचित नगरसेविका



मानसी काळोखे यांचे पती मंगेश काळोखे यांची १६ डिसेंबर रोजी राजकीय वैमनस्यातून हत्या करण्यात आली होती. या हत्येमागं पूर्वनियोजित कट रचल्याचं तपासात निष्पन्न झालं आहे. या प्रकरणात यापूर्वी मुख्य मारेकरी आणि काही सूत्रधारांना खोपोली पोलिसांनी अटक केली होती. मात्र राष्ट्रवादी काँग्रेस जिल्हाध्यक्ष सुधाकर घारे आणि प्रवक्ता भरत भगत हे दोघंही फरार होते. त्यापैकी भरत भगतला पोलिसांनी अटक केली. खोपोली पोलिसांनी खालापूर परिसरात सापळा रचत भरत भगत याला अटक केली. या अटकेनंतर हत्याकांड प्रकरणातील तपासाला मोठं यश मिळाले आहं. दरम्यान या गुन्ह्यातील आणखी एक मुख्य आरोपी सुधाकर घारे अद्याप फरार असून त्याचा शोध घेण्यासाठी पोलिसांची विशेष पथकं तयार करण्यात आली आहेत. "मंगेश काळोखे हत्याकांड प्रकरणातील फरार आरोपी भरत भगत याला खालापूर परिसरातून अटक केली आहे. या प्रकरणात यापूर्वी मुख्य आरोपींसह मारेकऱ्यांना अटक करण्यात आली आहे. हत्येमागं कट रचण्यात आला होता. याबाबतचे ठोस पुरावे आमच्याकडं आहेत. या गुन्ह्यातील आणखी एक आरोपी सुधाकर घारे फरार असून त्याचा शोध सुरू आहे. लवकरच त्यालाही अटक केली जाईल," अशी माहिती खोपोली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सचिन हिरे यांनी दिली.

